दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –८० | मंगळवार दि.२५ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-80 | Tuesday, Dt.25 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बाकीचे नेते, त्यांची शहरं भिकार**
# अजित पवारांचं पुन्हा वादग्रस्त विधान




महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. याच स्वभावामुळे बऱ्याचदा ते अडचणीतदेखील येतात. बीड जिल्ह्यातील सभेत अजित पवार भडकलेले दिसले. 'मी माझ्या भागात विकास करून दाखवला म्हणून तुमच्याकडे बोलायला येतोय. पण बाकीचे नेते फक्त बडबड करतात, त्यांची शहरं भिकारदद करून ठेवतात! यावेळी अजित पवार यांनी नाव न घेता शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर हल्लाबोल केला. जे आज माझ्यावर टीका करतात त्यांच्याच पक्षांनी मला उपमुख्यमंत्री केलं आणि खुर्चीत बसवलं. हे दुटप्पी वागणं बरं नाही, लक्षात ठेवा!, असे ते म्हणाले.

'जनतेने वारंवार साथ दिली, मी शब्दाचा पक्का'

'तुम्ही मला सहा-सहा वेळा उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता, मंत्री केलंत. माझ्यावर कितीही आरोप होवोत, मी स्वच्छ काम करतो आणि शब्द पाळतो. २०१७ नंतर २०२२ ला निवडणुका व्हायला हव्या होत्या, पण कोरोनामुळे उशीर झाला. आता चार वर्ष प्रतीक्षा केलेले कार्यकर्ते उत्साहाने मैदानात उतरले आहेत; ही निवडणूक कार्यकर्ते घडवणारी आहे.', असे अजित पवार म्हणाले.

स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाकडे दुर्दैवाने लक्ष गेलं नव्हतं, आता मी पालकमंत्री म्हणून पूर्ण लक्ष ठेवतोय. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाला १००० कोटींचा निधी देणार. पुणे-मुंबई रेल्वे आपण सुरू केली, ती आता अंबाजोगाईपर्यंत आणणार. माझ्या बीड जिल्ह्याचा आणि अंबाजोगाईचा विकास होईपर्यंत मी थांबणार नाही, असे अजित पवार म्हणाले.



## लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांना फटकारले

नांदेडच्या कंधार येथे अजित पवार म्हणाले, काही लोक धमकी देतायत की आम्हाला मतं नाही दिलीत तर लाडकी बहीण योजना बंद पडेल. अशा खोट्या भीतीला बिल्कुल बळी पडू नका! हा लाडका भाऊ तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. योजना सुरूच राहील, कोणतीही धमकी ऐकू नका.

## सर्वांना सोबत घेऊन विकासाचा निर्धार

कोणाशी भेदभाव नाही, सर्वांचा विकास करायचा आहे. उच्च शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी – सगळ्या क्षेत्रात मोठ्या योजना आणतोय. तुमची साथ हवी, मला पुन्हा संधी द्या, मी करून दाखवेन! अशा शब्दांत अजित पवारांनी कार्यकर्ते आणि मतदारांना ऊर्जा दिली. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात अजित पवारांनी विकासाच्या घोषणांसह विरोधकांना चांगलेच चिमटे काढले आणि आपल्या परीने मैदान मारल्याचे दिसून आले.

# उसाला ४००० दर मिळण्यासाठी
# शेतकरी आंदोलन

माजलगाव ।प्रतिनिधी

उसाला योग्य दर मिळण्यासाठी आज माजलगाव येथे ऊस उत्पादक शेतकरी यांनी चक्काजाम आंदोलनामध्ये सहभाग नोंदवला.माजलगाव तालुक्यात दोन सहकारी, एक खाजगी साखर कारखाने असून तीन गुळ कारखाने आहेत. सर्व कारखाने मिळून २४०० रुपये भाव देत आहेत. या प्रश्नावर झालेल्या बैठकीस तहसीलदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाठ फिरवली. यामुळे ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आणि चक्काजाम रूपाने आंदोलन उभारले.



या आंदोलनात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथजी शिंदे साहेबांच्या आदेशाने आणि विधानपरिषदेच्या सन्माननीय उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेत रास्ता रोको आंदोलनात सहभागी झाले. शेतकरी बांधवांचे लाडके भाऊ मा.ना.एकनाथजी शिंदे साहेबांनी प्रत्येक वेळी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. माजलगावतील साखर कारखानदार यांना शेतकऱ्यांचे सोयरसुतक नाही, ही पिळवणूक थांबवणे हेच शिवसेनेचे धोरण आहे. या आंदोलनात सहभागी होऊन मी शिवसेना पक्षातर्फे शेतकरी बांधवांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले आहे.

# बीड नगर परिषदेसाठी मागासवर्गीयांना आलेली अध्यक्ष पदाची संधी डावणाऱ्या सत्ताधारी प्रस्थापित अजित पवार गटाला धडा शिकविण्यासाठी

## स्मिता विष्णू वाघमारे यांना आंबेडकरी समाज बांधवांचा पाठिंबा

बीड ।प्रतिनिधी

बीड नगर परिषदेसाठी मागासवर्गीयांना आलेली अध्यक्ष पदाची संधी डावणाऱ्या सत्ताधारी प्रस्थापितांना व अजित पवार गटाला धडा शिकविण्यासाठी आज रोजी हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे बीड शहरातील आंबेडकरवादी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक घेऊन स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्णय घेण्यात आला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी जोपासत समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून लढा उभा करण्याचे काम करणाऱ्या दलित चळवळीतील पदाधिकाऱ्यांना उमेदवारी डावलून समाजाशी कसलीही बांधिलकी नसणाऱ्या व आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी जाहीर करून ४० वर्षानंतर आम्हाला मिळालेली राजकीय संधी हिरावून घेऊन मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याचे काम अजित पवार यांनी केले आहे.

आंबेडकरी समाज बांधवांच्या बैठकीत पप्पूजी कागदे, अजिंक्य चांदणे, बबन वडमारे,राहुल मस्के, वसंतराव ओगले, दिनकर बोराडे,अरुण सवाई, ज्ञानोबा माने, दीपक चौगुले, नितीन सोनवणे, उत्तमराव पवार, सत्यनारायण ढाका, अनुरथ वीर, मायाताई मिसळे, आम्रपाली साबळे,

(उर्वरीत पान २ वर)






### काळ्या फिती तोंडाला बांधून अजित पवारांचा निषेध

बीड नगर परिषद निवडणूकीत अजित पवार गटाने आंबेडकरी समाजाला, ऐनवेळी उमेदवारी नाकारल्याने, आंबेडकरी समाज बांधवांकडून तोंडाला, काळ्या फीती बांधनू जाहीर निषेध केला.

# बीडमधील हुकूमशाही उलटून टाकू – आ. विजयसिंह पंडित

## विस्थापितांच्या पोरांसाठी आ. विजयसिंह पंडित यांचा प्रचारात झंझावात

बीड ।प्रतिनिधी

बीड नगर परिषदेची निवडणुक ४० वर्षांच्या हुकूमशाही विरुध्द विस्थापित पोरांची लोकशाही अशी झाली आहे. या निवडणुकीत विस्थापित पोरांच्यामागे खंबीर नेतृत्व देताना आ. विजयसिंह पंडित बीड शहर पिंजून काढत आहेत, प्रचंड प्रतिसाद आणि समर्थन मिळवताना बीडमधील निवडणुक प्रस्थापित क्षीरसागरांच्या तावडीतून बाहेर काढली आहे. जनसामान्य लोकांना सोबत घेऊन राष्ट्रवादीच्या घडीचा 'विजय' पंडितांनी दृष्टीक्षेपात आणला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे आणि प्रभाग क्र. २१ च्या उमेदवार सौ. पायल दत्ता जाधव आणि गुंजाळ धर्मराज (बाळासाहेब) लक्ष्मण यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांची प्रचंड जाहिर सभा झाली.

नाळवंडी नाका परिसरात झालेल्या सभेला महिला-पुरुष मतदारांसह कार्यकर्त्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.बीड नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र.२१ च्या उमेदवार सौ. पायल दत्ता जाधव आणि गुंजाळ धर्मराज (बाळासाहेब) लक्ष्मण तसेच प्रभाग क्र. १० मध्ये सौ. तांदळे उषा गणेश व सौ. शेळके रजनी अक्षय यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांच्या जाहिर सभा झाला. यावेळी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय नेत्या डॉ.ज्योती मेटे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, सुहास पाटील, माजी नगरसेवक शेख निजाम, बप्पासाहेब घुगे, ड.राजेंद्र राऊत, पांडुरंग आवारे, सरपंच संघटनेचे कालिदास नवले, अनिल घुमरे, बळीराम गवते यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना, शिवसंग्राम चे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. (उर्वरीत पान २ वर)



### बाळासाहेब गुंजाळसाठी मैदान हाऊसफुल

प्रभाग क्र. १० मधील उमेदवार सौ. पायल दत्ता जाधव व गुंजाळ धर्मराज (बाळासाहेब) यांच्या प्रचारार्थ नाळवंडी नाका येथे झालेल्या कॉर्नर सभेचे रुपांतर विराट सभेत झाले. बाळासाहेब गुंजाळ यांना पाठिंबा देण्यासाठी या प्रभागातील महिला-पुरुष मतदारांसह कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही गर्दी विजयाकडे घेऊन जाणारी आहे, ही लाट असून तीला कोणीही रोखू शकत नाही असे यावेळी बोलताना बाळासाहेब गुंजाळ म्हणाले.

### क्षीरसागरांनी माणूस माणसात ठेवला नाही – कालिदास नवले

बीड शहरात क्षीरसागरांनी फोडा आणि झोडा ही निती वापरून माणसात माणूस ठेवला नाही, घरा-घरांत भांडणे लावण्याचे काम त्यांनी कले. नगर पालिकेच्या सत्तेचा गैरवापर करून लोकांच्या जमीनी लाटल्या. यापूर्वीच्या निवडणुकीत कुणी दाजी म्हणून, कुणी जावई म्हणून मते मागितली तर आता मुजीबभाईची सासू म्हणून आम्ही मते मागितली तर बिघडले कुठे ? असा सवाल करून विरोधकांना त्यांची जागा दाखविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

# न्यायदेवतेने अमृत काका सारडा यांना न्याय दिला

## मा. न्यायमूर्ती एस. आर. शिंदे यांनी उमेदवारी वैध असल्याचा दिला निर्णय

बीड प्रतिनिधी

पेठ बीडच्या विकासासाठी ३० वर्षांपासून कार्यरत असलेल्या अमृत काका सारडा यांच्या उमेदवारीला जिल्हा न्यायालयाने कायदेशीर मान्यता देत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवारी कायम ठेवण्याचा जो निर्णय दिला होता, त्यावर दाखल झालेल्या अपीलवर मा. न्यायमूर्ती एस. आर. शिंदे मॅडम यांच्या कोर्टाने सुनावणी केली आणि त्यानंतर उमेदवारी कायम ठेवण्याचा आदेश देत अमृत काका सारडा यांच्या बाजूने निकाल दिला.

निवडणूक प्रक्रियेतील आवश्यक कागदपत्रांची तपासणी आणि सादर करण्यात आलेल्या मुद्द्यांच्या आधारे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले की उमेदवारी निवडणूक नियम आणि कायद्यानुसार वैध आहे.

या सुनावणी दरम्यान ड. बालाप्रसाद जाजू यांनी कायदेशीर बाजू प्रभावीपणे मांडली. याचप्रमाणे २०१६ सालीही अमर नाईकवाडे यांनी याच पद्धतीने कैलास बीयानी यांच्यावर तक्रार केली होती,

(उर्वरीत पान २ वर)



### पेठ बीडच्या विकासासाठी दृढ संकल्प

अमृत काका सारडा यांनी पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या माध्यमातून अनेक वर्षे सातत्याने काम केले असून त्याममध्ये पायाभूत सुविधा, सामाजिक उपक्रम, शैक्षणिक सहाय्य आणि नागरिकांच्या गरजांशी निगडित सेवा या क्षेत्रांत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.




# अवैध गावठी पिस्तुल बाळगून वायभटवाडी चौकामध्ये दहशत माजवणाऱ्या इसमाला तात्काळ अटक

बीड ।प्रतिनिधी

२३.११.२०२५ रोजी सपोनि मधुसुदन घुगे यांना माहिती मिळाली की, आरोपी पिस्तुल बाळगून वायभटवाडी चौकातील लोकांना धमकावत आहे. त्याने फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने गावठी पिस्तूल डोक्याला लावले व धमक्या दिल्या.ही माहिती मिळाल्यावर सपोनि मधुसुदन घुगे व पोलीस स्टाफ बीड बायपास येथे गेले आणि त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपीच्या ताब्यात एक अवैध गावठी पिस्तुल, एक जिवंत

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# श्रमेव जयते

पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी संसदेत श्रम संहितेला मंजुरी देऊन भारतातील ४० कोटी कामगारांना त्यांच्या श्रमांचा लाभ मिळवून दिला आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. या सुधारणा स्वतंत्र भारतातील सर्वात मोठ्या आणि परिवर्तनकारी असल्याचे सांगण्यात येत आहेत. या नव्या सुधारणा वसाहतवादी काळातील म्हणजे कालबाह्य आणि निरूपयोगी झालेल्या ब्रिटिश राजवटीतील कामगार कायद्यांची जागा घेतील. भारताला विकसित देश बनवण्याच्या दृष्टीने या नव्या सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. ट्रेड युनियन्स आणि डाव्या प्रणित पक्षाच्या कामगार संघटना सोडल्या, तर बहुतेक सर्वांनी या सुधारणांचे स्वागत केले आहे. कारण या सुधारणेमुळे आर्थिक लाभाबरोबरच कामागारांना सुरक्षाही देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामुळे लिंगभेद पूर्णपणे संपुष्टात आला आहे. लिंगभेद आता संपुष्टात आल्याचे जाहीर होत असून, देशभरातील लाखो महिलांच्या दृष्टीने या सुधारणा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. एमएसएमई म्हणजे लघू, सूक्ष्म व मध्यम उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. देशातील जवळपास एक पंचमांश एमएसएमई उद्योगांचे नेतृत्व महिलांकडे आहे. या महिला उद्योजकांना अधिक सामर्थ्य व संधी देण्यासाठी या सुधारणा 'नारीशक्ती'चा खरा सन्मान करतात.

या कोडमुळे महिला कामगारांची उत्पादकता वाढेल, कार्यक्षेत्रात त्यांना अधिक संधी मिळेल आणि सामाजिक न्यायाची भक्कम पायाभरणी होईल. हे या सुधारणांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. आतापर्यंत ही नियमावली अनेक क्षेत्रांत पाळली जात नसे; मात्र आता असा भेदभाव चालणार नाही. महिलांना समोर ठेवून हे कोड तयार करण्यात आले असले तरीही सर्व कामगारांना आणि देशातील कामगारशक्तीचा विचार करण्यात आला आहे. नव नियुक्तांना नियुक्तीपत्रे देण्याची तरतूद, महिलांसाठी कामाचे तास निश्चित करणे आणि वेतन वेळेवर देणे, कामावर अपघात झाला, तर त्याची पूर्ण भरपाई देणे आणि कामगार वर्गाची प्रतिष्ठा वाढवणे हा लेबर कोडचा उद्देश आहे. हे नवीन लेबर कोड का आणावे लागले मागे एक विचार आहे. तो म्हणजे जे लेबर म्हणजे कामगारविषयक कायदे होते ते सर्व कालबाह्य झाले आहेत आणि ते ब्रिटिश काळातील होते. त्यामुळे त्यामध्ये व्यापक सुधारणा करणे काळाची गरज बनली होती. या नव्या कोडचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांना आता रात्रपाळीत काम करण्याची तसेच धोकादायक व जड यंत्रसामग्री हाताळणाऱ्या क्षेत्रात, जसे की खाणकाम, अशा ठिकाणी काम करण्याची औपचारिक परवानगी देण्यात आली आहे. मात्र, यासाठी संबंधित महिलांची स्पष्ट संमती आवश्यक असेल आणि त्यांच्या सुरक्षेसाठी कडक उपाययोजना बंधनकारक असतील. यामुळे लिंगाधिष्ठित भेदभाव दूर करण्याचा ठोस प्रयत्न केला गेला आहे. तसेच तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. या कोडद्वारे प्रत्येक कामगाराला सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे त्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. याशिवाय, सर्व कामगारांसाठी ईएसआयसीचे दरवाजे खुले करण्यात आले आहेत. एकच कामगार जरी धोकादायक कामात गुंतलेला असेल, तरीही त्याला ईएसआयसीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे.

# अंबड शहराच्या मागासलेपणा दुरावलेला विकासासाठी नैतिक जबाबदारी समजून कर्तव्य बजावणार- सौ.श्रद्धा शिवप्रसाद चांगले



अंबड ।प्रतिनिधी

मराठवाड्याबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रात धार्मिक,शैक्षणिक, सांस्कृतिक,कला,साहित्य क्षेत्रात अंबड शहर तालुक्याचे मुख्य ठिकाण असणारे शहर आहे. मा.आमदार राजेश टोपे हे या मतदारसंघाचे आमदार असताना मराठवाड्यात झाला नाही तो विकास अंबड शहराचा झाला. पंडित गोविंदराव जळगावकर नाट्यगृह,पॉलिटेक्निक कॉलेज मत्सोदरी देवी मंदिर विकास १०० रुग्ण खात्याचे अद्यावत रुग्णालय अंबड शहरातील अंतर्गत रस्ते असे विधायक कामे आजही मा.आ.राजेश टोपे यांच्या विकासाची साक्ष देतात.

परंतु गेल्या दहा वर्षापासून अंबड शहराची सत्ता भाजपाच्या हाती येताच अंबड शहराचा विकास खुंटला विद्यमान आमदार व घरच्याच नगराध्यक्षा यांनी अंबड शहराचा विधायक व दीर्घकालीन विकास केलेला नाही. आणि याच अंबड शहराच्या दुरवलेल्या व सर्वसामान्य जनतेला भेडसवणाऱ्या प्रश्नाबाबत राष्ट्रवादीचे गटनेते शिवप्रसाद चांगले यांनी सातत्याने आवाज उठवत आपली नैतिक जबाबदारी पार पाडली आणि खऱ्या अर्थाने अंबड शहराच्या खुंटीत झालेल्या विकासावर दीर्घकालीन उपाय योजना करण्यासाठी अंबड शहराच्या नावलौकिकास साजेशे व विकासात्मक कार्य करण्यासाठी त्यांच्या धर्मपत्नी सौ.श्रद्धा शिवप्रसाद चांगले या अंबड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी उभे आहेत.

त्यांच्याशी चर्चा केली असता अंबड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्षा म्हणून अंबड शहरवासीयांनी एक संधी दिल्यास मी माझी नैतिक जबाबदारी समजून माझे आद्य कर्तव्य पार पाडणार असल्याची अत्यंत आत्मविश्वास्मक,परिणामकारक भावना व्यक्त केली. अंबड शहरातील जनतेला गुत्तेदारी हवी की अंबड शहराचा विकास ? असा प्रतिप्रश्न त्यांनी वृत्तपत्रच्या माध्यमातून जनतेला विचारला.आणि यावर अंबड शहरातील जनता जी विकासापासून कोसो दूर झाली ते कसे प्रतिसाद देतात हे औचित त्याचे ठरणार आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९५६/२०२५**
वसंताबाई शिवनारायण झंवर विरूध्द निरंक
**(मार्फत-ॲड.एल.जी.कुलकर्णी)**

ज्याअर्थी मयत नामे **शिवनारायण शाळीगराम झंवर हे दि.१६.१२.१९९९ रोजी सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.वसंतबाई शिवनारायण झंवर, वय-७८ वर्षे, धंदा-शेती, रा.सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड, २.गणेश बालाप्रसाद बाहेती, वय-२८ वर्षे, धंदा-नौकरी, रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शिवनारायण शाळीगराम झंवर, रा.सिरसमार्ग ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२४/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१४०८ दि.२१.११.२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **ज्ञानदेव मोकिंदा साळवे, रा.घुंगर्डे हादगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोकिंदा तुळशीराम साळवे | वडील | ०१.०६.१९९२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९२० दि. ०७.११ .२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **जावेद खाजा अब्दुल कादर सौदागर रा.गोंदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सौदागर मो.अयान मो.जावेद | मुलगा | ०५.०७.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८९८ दि. -.- .२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शाकिर कलिंदर शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शाकिर कलिंदर शेख | स्वतः | ०७.०८.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-७९६ दि. . .२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फय्याज रियाज शेख, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फय्याज रियाज शेख | स्वतः | १९.०७.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११४८ दि. २४.१० .२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **नाजम चाँदखाँ पठाण रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | नाजम चाँदखाँ पठाण | स्वतः | ०५.०३.१९६६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०२५ दि. -.- .२०२५**
## जाहिर प्रगटन
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रिजवाना मुसा सय्यद, रा.टाका ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रिजवाना मुसा सय्यद | स्वतः | ०४.०९.१९९० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

पान १ वरून...

**बीड नगर परिषदेसाठी ....**

भगवान कांडेकर, सिद्धार्थ शिंनगारे, नितीन वाघमारे, यांच्यासह आंबेडकरी संघटनांच्या सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी स्मिता विष्णू वाघमारे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.बीड नगर परिषदेची नगराध्यक्ष पदाची निवडणूक समाज बांधवांच्या स्वाभिमानाची निवडणूक असून मागासवर्गीय उमेदवारासाठी आरक्षित असलेल्या नगर अध्यक्षपदासाठी अनुसूचित जातीच्या समाजाच्या जागेवर आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन भू-मापिया, रेती माफिया व गुटखा माफिया यांच्या ताब्यात बीड नगर परिषद देण्यासाठी व आपल्याला संविधानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या आरक्षणाच्या हक्क व अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम करणाऱ्या अजित पवार यांच्यासह अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या निर्णयाला नेस्तनाबूत करण्यासाठी समाजाची एकजूट महत्वाची आहे. बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत आंबेडकरी समाज बांधवांनी राजकीय ताकद निर्माण करण्यासाठी अजित पवार गटाच्या घड्याळ या चिन्हाच्या उमेदवाराला पराभूत करून, स्मिता विष्णू वाघमारे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार आंबेडकरी चळवळीतील सर्वपक्षीय पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधवांनी बैठकीत निर्णय घेवून केला.

या निर्णायक बैठकीस राजू जोगदंड, आशिष चव्हाण, भास्कर सरपते, यशवंत कदम,किसन तांगडे, सुभाष लोणके, अशोक ठोकळ, रवी वाघमारे, हनुमंतराव कांबळे,डी.जी वानखेडे, गौतम सोनवणे, प्रा. बाळासाहेब वाघमारे, प्रा. विठ्ठल गाडे, प्रा. सिरसाट, आदमाने, रमेश माटे, शाहू डोळस, नाना मस्के, महेश आठवले, अनिल बोराडे, संगीता वाघमारे, अरुणाताई आठवले, रेश्माताई जोगदंड,अनिताताई डोंगरे, शोभा गलांडे, शेख भाभी, सुभाष तांगडे, ड.सुरेश वडमारे,ड. तेजस वडमारे,ड. देवत्त शिंदे, ड. राहुल साळवे,ड. अशोक वाघमारे,ड.दीपक ससाणे, सुर्यकांत जोगदंड, मधुकर लोंढे, अशोक वीर, प्रकाश वक्ते, बंडू विसर्जन अविनाश जोगदंड प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, नागेश दुबळे, विलास जोगदंड, संजय हनवते, भारत कांबळे, भैय्या साळवे, गौतम धन्वे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, अक्षय कांबळे, महेंद्र वडमारे, अक्षय कोकाटे, भैय्या मस्के, रतन वाघमारे,नामदेव वाघमारे, सतीश शिनगारे, शाम वीर, गौतम कांबळे, सोनू वडमारे, यांच्यासह बीड शहरातील आंबेडकरी संघटनांचे सर्व पक्षी पदाधिकारी व आंबेडकरी समाज बांधव या निर्णायक बैठकीस हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

**अवैध गावठी पिस्तुल ....**

काडतुस आणि स्कॉरपिओ क्र. एम.एच.२३ बीबी ५५०५ हे वाहन मिळून आले. याप्रकरणी यशराज रामा जाधव, वय १९ वर्ष, रा. वायभटवाडी, ता.जि.बीड. यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे गु.र.नं. ३३०/२०२५, कलम १०९, ३५२, ३५१ (२) भारतीय न्याय संहिता सह कलम ३/२५ भा.हा. कायदा सह कलम १३५ म.पो.का. प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे.आरोपी सध्या पोलीस कोठडीमध्ये आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. मधुसुदन घुगे, पोउपनि श्री. अर्जुन गोलवाल, पोह/८५५ आबुबकर शेख, पोह/२१०७ बांगर, पोशि/२२७३ सादेक पठाण, चा.पोह/१४४८ महेश गर्जे (सर्व पो.स्टे पिंपळनेर) यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली.भविष्यातही सराईत गुन्हेगारांवर व कायद्याला न जुमानणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तात्काळ

पान १ वरून...

कार्यवाही करून त्यांना अटक करण्याचे निर्देश श्री. नवनीत काँवत व श्री. सचिन पांडकर यांनी दिले आहेत.

**न्यायदेवतेने अमृत ...**

मात्र तेव्हाही त्यांची याचिका फेटाळली गेली होती.२०१६ मधील प्रकरणातील न्यायालयीन नोंदींचाही या प्रक्रियेत संदर्भ देण्यात आला आणि त्या आधारेही उमेदवारी योग्य असल्याचे न्यायालयाने स्वीकारले. अमृत काकांच्या बाजूने निकाल दिला. अमृत काका सारडा यांच्या बाजूने ड. बालाप्रसाद जाजू,ड.राधेश्याम जाजू यांनी बाजू मांडली. तर अमर नाईकवाडे यांच्या बाजूने उच्च न्यायालयाचे ड. सय्यद तौफिक यांनी बाजू मांडली. पेठ बीड शहर विकास कृती समितीच्या माध्यमातून जात, पात, धर्म न पाहता हजारो नागरिकांच्या सुख-दुःखात उभे राहणारे, विकासाचे काम प्रत्यक्षात करणारे आणि लोकांचा विश्वास जिंकलेले अमृत काका हे या निवडणुकीत आघाडीवर आहेत हे चित्र स्पष्ट झाले आहे.

**बीडमधील हुकूमशाही...**

पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, नगर परिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्ते आणि नागरीकांना वाऱ्यावर सोडून संधी साधूंना बीडची जनता या निवडणुकीत त्यांची जागा दाखवील. शहराचे मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही प्रामाणिक प्रयत्न करून असे सांगून बीड शहरात विरोधक भ्रम निर्माण करून वेगवेगळ्या अफवा पसरविल्या जात आहेत. कुणाच्याही दबावाला बळी न पडता मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे, बीड शहराच्या उज्वल भविष्यासाठी घडी या चिन्हावर मतदान करून राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करून क्षीरसागरांच्या तावडीतून नगर पालिकेची मुक्तता करा असेही ते यावेळी म्हणाले.

प्रचंड जनसमुदाय विजयावर शिक्कामोर्तब करणार - कल्याण आखाडे

क्षीरसागर परिवाराने चाळीस वर्षांत फक्त स्वतःचाच विकास केला, जाती-जातीत भांडणे लावून घर फोडण्याचे काम केले. विकासापासून बीड शहर दूर नेऊन ठेवले, रस्ते नाहीत, नाल्या नाही, प्यायला पाणी मिळत नाही, शहराची पार दुर्गंधी करून टाकली आहे, बीड शहराला स्वच्छ व सुंदर करायचे असेल तर राष्ट्रवादीच्या सर्व उमेदवांराना विजयी करून नगर पालिकेवर विकासाचा झेंडा फडकवा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

बीड नगर परिषद भ्रष्टाचार मुक्त करण्यासाठी घड्याळाचा गजर करा - डॉ.ज्योतीताई मेटे

बीड नगर परिषदेत भ्रष्टाचाराच्या विरोधात सर्वप्रथम लोकनेते स्व.विनायक मेटे यांनी आवाज उठविला होता. नगरपरिषदेच्या माध्यमातून विरोधकांनी भ्रष्टाचाराचा कळस केला, शहरात विकासाच्या प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, पाणीपुरवठा योजनेत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला. या सर्वांचा हिशोब करण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे. बीड नगर परिषद भ्रष्टाचार व भयमुक्त करण्यासाठी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे यांच्यासह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी बोलताना शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड शहराला मोकळा श्वास घेण्यासाठी क्षीरसागरांना नगर परिषदेतून हाकला आणि उज्वल भविष्यासाठी राष्ट्रवादी आणि शिवसेना मित्रपक्षाच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

आत्तापर्यंत गोरगरीबांच्या मतांवर निवडून येणारे संधीसाधू धर्मांद शक्तिबरोबर गेले, त्यांना धडा शिकविण्याची हीच योग्य वेळ आहे असे प्रतिपादन भागवत तावरे यांनी केले.



# भ्रष्टाचारामुळे नगरपालिका पोकरून खाल्ली त्यांना मत मागण्याचा काय अधिकार- आ.प्रकाश सोळंके

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव नगरपालिका आता चांगलीच रंगात आलेली आहे.नगरपालिकेच्या एकुण तेरा प्रभाग मधुन २६ उमेदवार व एक नगराध्यक्षा यांचे प्रचारासाठी आ.प्रकाशदादा सोळंके, खलील पटेल,खुर्शीद नाईक, नवाब पटेल,डॉ.वसीम मनसबदार,सिद्धार्थ ससाणे, डॉ.उद्धव नाईकनवरे,घोडे व इतर हे प्रभाग क्र.२चे उमेदवार सौ.रत्नामाला राकेश साळवे व इम्रान शेख यांचे प्रचारार्थ दि.२३ रविवार रोजी साय.७वा. चे सुमारास आले होते. यावेळी आ.सोळंके म्हणाले कि,या निवडणुकीत विरोधकांना कोणताही ठाम असा मुद्दा राहिला नाही.ते भ्रष्टाचारी आहेत.त्यांना जनतेने प्रश्न विचारावा कि,विरोधक यांना जेलमध्ये का जावे लागले होते.त्यांचे कालावधीत धरण उशाला कोरड घशाला अशी ही परिस्थिती आहे.पाणी पुरवठ्यासाठी भरघोस अनुदान आणले आहे.त्यामुळे पुढील कामकाज पुर्ण करावयाचे असेल तर राष्ट्रवादीच्या हातात सत्ता द्या. तसेच मोफत आरोग्य सेवा पुर्ण करणार आहे.ट्रॉमा केअर सुद्धा येथेच चालू होणार आहे. आठवडी बाजाराचा प्रश्न मिटवनार आहे.छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा उभारणी करिता फंड कमी पडु दिला जाणार नाही. तसेच शहरात चित्रपटगृह, मुस्लिम शादी खाना हे काम सुद्धा पुर्ण करावयाचे आहे. शहरातील भोगवटाधारक जे लोक आहेत,त्यांना नियमित करून त्यांचेसाठी प्रत्येकी अडीज लाख रुपये पर्यंतचे घरकुलासाठी अनुदानाचा लाभ देण्यात येणार आहे. शहरातील उघड्यावर नाल्या आहेत,त्यामुळे रस्त्यावर पाणी येते.त्यामुळे भुयारी नाल्या देण्यात येतील.महिला व पुरुष यांचेसाठी शौचालय उभारणार आहोत.

विरोधकांचे हातात नगरपालिका दिल्यास ते किती दिवस जेल मध्ये राहतील हे सांगू शकत नाही.विरोधकांकडे कोणते मुद्दे आहेत.त्यांची अशी परिस्थिती झाली कि, आमच्याकडे बघा अन फुल वहा,असे चालणार नाही. कचऱ्यासाठी विशेष तरतूद केल्या जाईल.घडी चुकली कि पीढी बिघडेल.त्यामुळे घड्याळ चिन्हावर बटण बघुन बटण दाबा.असे आवाहन त्यांनी केले.यावेळी प्रभाग २मधील मतदार बंधु भगिनी मोठ्याप्रमाणात हजर होते.

# अंबड प्रभाग ७ मध्ये भाजपचे डार्क हॉर्स शेख फेरोज (अध्यक्ष) यांना

## जनसामान्यांचा प्रचंड प्रतिसाद

### विकास हवा तर फेरोजच हवा चा नारा जोरात

अंबड ।प्रतिनिधी

अंबड शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार शेख फेरोज (अध्यक्ष) यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताच स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे.अर्ज दाखल करण्यापुरतेच न राहता त्यांनी सुरू केलेल्या दमदार जनसंपर्क मोहिमेला मिळणारा उत्स्फूर्त आणि तुफानी प्रतिसाद पाहता या निवडणुकीतील खरा डार्क हॉर्स म्हणून त्यांचे नाव घेतले जात आहे.

घराघरांत पोहोचणारा चेहरा नेता नाही आपला माणूस शेख फेरोज (अध्यक्ष)यांनी गेल्या काही वर्षांत प्रभागातील नागरिकांशी निर्माण केलेली विश्वासाची नाळ आज त्यांच्या प्रचाराचे सर्वात मोठे बळ ठरत आहे. घराघरांतून मिळणारा आशीर्वाद,तरुण मतदारांचा वाढता कल,महिलांचा ठाम विश्वास आणि सर्वसामान्यांमध्ये तयार झालेली आपला माणूस ही प्रतिमा विरोधकांसाठी मोठे आव्हान बनली आहे.त्यांच्या संवादशैलीमुळे लोक त्यांना नेता म्हणून नाही तर मदतीला सदैव धावून जाणारा सोबती म्हणून मानतात आणि हाच त्यांच्या प्रचाराचा खरा णडझ बनला आहे.

कामाचा धडाका आणि विकासाची ठोस कर्तबगारी

शेख फेरोज यांनी प्रभाग क्रमांक ७ मधील अनेक प्रलंबित कामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला.त्यांनी सुमारे ७०० नागरिकांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य मिळवून दिले,२५०-३०० नागरिकांची नवीन रेशनकार्डे करून दिली,स्वच्छता, रस्ते दुरुस्ती,पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत गरजांवर सातत्यपूर्ण लक्ष दिले यामुळे प्रभागात दिसणारा विकास आणि विकासाचे दाखले यांची ठोस जोड निर्माण झाली आहे.

युवा व रोजगार तरुणांचा खास नेता

तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी त्यांनी केवळ बोलण्यापलीकडे जाऊन रोजगारक्षम उपक्रम राबवले. त्यामुळे प्रभागातील युवकांमध्ये फेरोज यांच्याबाबत विशेष आकर्षण आणि



विश्वास निर्माण झाला आहे.

सुख-दुःखाचे सोबती २४ तास उपलब्ध असणारा नेता

रात्री-अपरात्री कुणालाही मदतीला धावून जाणे आजारपण-अपघात किंवा कुटुंबातील संकटाच्या वेळी उपस्थित राहणे या त्यांच्या स्वभावामुळे ते घराघरात नाव घेण्याजोगे बनले आहेत. संवेदनशीलता आणि जबाबदारी यांचे अनोखे मिश्रण त्यांच्या नेतृत्वशैलीत दिसते.

# चित्रपटसृष्टीतील अभिनयाचा ‘ही-मॅन’ काळाच्या पडद्याआड


मुंबई ।प्रतिनिधी

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका तेजस्वी पर्वाचा अंत झाला असून, अभिनयाचा ‘ही-मॅन’ काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, धर्मेंद्र यांच्या अभिनयात नैसर्गिकता, साधेपणा आणि मनाला भिडणारी भावनिक ताकद होती. ‘शोले’, ‘चुपके चुपके’, ‘अनुपमा’, ‘सत्यकाम’, ‘दिल्लगी’ अशा अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहेत. विशेषतः ‘शोले’मधील त्यांनी साकारलेली ‘वीरू’ची भूमिका रसिकांच्या मनात अजरामर आहे. धर्मेंद्र यांचा चित्रपट प्रवास म्हणजे मेहनत, समर्पण आणि कलाविश्वाप्रती असलेल्या निःस्वार्थ प्रेमाचे प्रतीक आहे. त्यांनी अनेक पिढ्यांतील प्रेक्षकांना आपल्या अभिनयातून निखळ आनंद दिला. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे.

धर्मेंद्र यांनी आपल्या दीर्घ आणि उल्लेखनीय कारकिर्दीत आठ वेळा ‘फिल्मफेअर पुरस्कार’ मिळवले होते. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि दमदार अभिनयामुळे त्यांना ‘हिंदी सिनेमा’चा ‘ही-मॅन’ म्हणून ओळख मिळाली होती. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कुटुंबियांना, चाहत्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# मानापमान आणि आत्महत्या

शाळेत शिक्षकांनी अपमान केला तो सहन झाला नाही म्हणून मृत्यूला कवटाळलं भाषेबाबत वाद झाला त्यात अपमान वाटला हणून आत्महत्या केली. अशा बातम्या वाचनात येत आहेत. ...यात मुळापासून काही चुकतय हे जाणवतं परंतु नेमकेपणाने काय चूक होत आहे हे लक्षात येतय का कुणाच्या?पालक चुकत आहेत की मुलं... माझ्या मते या बाबतीत पालकांची मुलांना मागेल ते उपलब्ध करून देण्याची सवय तसेच लाड म्हणता येणार नाही पण मुलांना अति जपण्याची जी सवय आहे ती कारणीभूत आहे.शिक्षण धोरणांमुळे आपण 'छडी लागे छम छम अनू विद्या येई घम-घम' ही पद्धत मोडीत काढली याचाही काहीसा परिणाम आहे. एकत्र कुटुब पद्धती काळाच्या ओघात संपत चालली आणि शहरीकरणाच्या विस्तारात अपरिहार्यपणे आलेला त्रिकोणी आणि चौकोनी कुंटुब व्यवस्थेच्या नव्या पद्धतीचा परिपाक म्हणून या प्रकारच्या आमहत्यांकडे पहाव लागेल.




पालकांनी एकच अपत्य आहे म्हणून त्याला अगदी तळहातावरील फोडाप्रमाण जपताना त्याला खंबीर बनवणे देखील आवश्यक याची जाणीव ठेवण्याची वेळ आली आहे. आपण ज्यांना देशाचे भविष्य म्हणून बघतो त्यांना भविष्याची ओळख घरापासूनच करून द्यावी लागेल. अतिप्रमाणात जपले तरं त्यातून होणारे धोके या प्रकारच्या घटना समोर आणतात.

कौतूक करणे जितके आवश्यक आहे तितकीच आवश्यकता वेळोवेळी परिस्थितीची जाणीव करून देणे, वास्तवाचे भान पाल्यांला देणे यातून त्याचा सर्वांगिण भावनिक विकास होणार आहे. केवळ एकाच पद्धतीने मी काही कमी पडू देणार नाही या भूमिकेत राहणे पालकांनी टाळले पाहिजे.जी पिढी आज पालकांच्या भूमिकेत आहे त्या पिढीने आपल्या बालपणात तपासून पाहिले तर याचे उत्तर सहज मिळेल. परिस्थितीशी संघर्ष करीत घरच्यांचे टोमणे सहन करीत प्रसंगी शाब्दीक मारासोबतच शारिरीक शिक्षा सहन करून आणि व्यवहार ज्ञान मिळवून समाजात आपण स्थान निर्माण केले याच स्वरूपात पुढच्या पिढील देखील घडवण्याची तयारी ठेवावी लागेल.मुलांसाठी' ऋळर्षीं झींपळीहाशर्पीं धोरण हे सर्वोत्तम ठरु शकते चांगल्या कामाचे कौतूक जरुर करा त्यासाठी प्रोत्साहन म्हणून सुविधा, सवलत द्या प्रसंगी रोख खर्च करा मात्र उलट स्थितीत त्याला शिक्षा होणार आहे. याची जाणीव असू द्या आणि गरज भासल्यास शिक्षा देखील करा. यातून भावनिकदृष्ट्या मुले खंबीर होतील.

सातत्याने तो म्हणेल ती पूर्वदिशा असे धोरण त्याच्याच वाटचालीत अडथळा निर्माण करणार आहे याची जाणीव सातत्याने असली पाहिजे, बरेच पालक मुलांचा हट्ट पुरविण्यासाठी कृत्रिम अर्थिक बुडबुडा निर्माण करतात. आपल्याला हव ती भावना मुलांमध्ये विकसीत झाली तर हा बुडबुडा फुटल्यावर पुढील वाटचाल अवघड होते.

मोबाईलचा हट्ट पुरवला नाही म्हणून होणाऱ्या आत्महत्या हा बुडबुडा फुटण्यामुळे झालेला मानसिक स्तरावर धक्यात परिवर्तित होतो आणि त्यामुळे असे प्रकार घडतात. हंगामा चित्रपटात नवी पिढी कशी भांडते याचे सुंदर चित्रण आहे. केवळ एकमेकांना शाब्दीक हमरीतुमरीच्या पलिकडे भांडण जात नाही... आजची पिढी सोशल नेटवर्कची पिढी बनल्यामुळे 'ट्रोल' करणे हे शौर्याचे लक्षण झाले आहे. 'ट्रोल' करणे अर्थात एक प्रकारे 'कुच्चर ओटयावरील हमरी-तुमरी म्हणता येईल. त्यात इंटरनेटचा विस्तार आणि फॉलोअर्स ची संख्या यामुळे 'ट्रोल' करणाऱ्या व्यक्तीचे केवळ नाव दिसते आभासी जगात ती एक प्रतिक्रिया देणारी व्यक्ती वास्तवात नेमकेपणाने कोण आहे याची माहिती नसताना आपण मनाला लावून घेणं हे मनाच्या कमकुवतपणाचे लक्षण आहे.

जितकी माध्यमे तितके कुच्चर ओटे असा प्रकार आहे. आभासी युग आणि वास्तव यात खूप मोठा फरक आहे. तो फरक आपण जाणून घेतल पाहिजे. आणि वेळीच सावध होऊन नेमके पालकत्व निभावणे शिकले पाहिजे जेणे करून आपण आपले भविष्य मानणाऱ्या प्रियजनांना गमावण्याची वेळ येणार नाही.

आत्महत्यांचा विचार करताना गेल्या १० वर्षात शालेय विद्यार्थ्यांमधील आत्महत्यांचे प्रमाण ६५ टक्के इतके वाढले आहे. ही बाब खरोखर गंभीर आहे. १५ ते २९ वर्षे वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थीनींचा यात समावेश आहे. इनफ्लयुएन्सर' नावाने ओळख निर्माण करण्यात यश मिळाले व ट्रोलींग मुळे मानसिक ताण येऊन आत्महत्या हा प्रकार वाढीस लागला आहे. आभासी जगातील टिकेला अपमान समजने हे त्यामागचे कारण मानले तरी पालकांच्या चुका अधिक कारणीभूत आहेत असे माझे मत आहे

**-प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी बीड

# मोमीनपुरा राष्ट्रवादीला आशिर्वाद देणार - आ.विजयसिंह पंडित

### गेवराई शहरातील मोमीनपुरा प्रभागात मतदारांशी साधला संवाद

**प्रतिनिधी @ गेवराई**

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या संस्कारातूनच शिवछत्र परिवाराने सर्वधर्म समभाव राजकारण केलेले आहे. आदरणीय दादांचा वारसा भैय्यासाहेब आणि आम्ही पुढे चालवत आहोत. गेवराई शहरातील मोमीनपुरा भागातील मतदार बांधवांनी नेहमीच शिवछत्र परिवाराला सहकार्य केलेले आहे. त्यामुळे या नगर परिषद निवडणुकीमध्ये सर्वाधिक लिड मोमीनपुरा भागातून मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करून मोमीनपुरा भागाचा विकास करण्यासाठी राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांसह सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.



गेवराई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितल महेश दाभाडे व प्रभाग क्र. ६ च्या उमेदवार सौ. वैशाली किशोर कांडेकर व जाकेरा बेगम इस्माईल शरीफ यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांनी आज प्रचार रॅली काढून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी आवेजसेठ, किशोर कांडेकर, सय्यद वसोद्दीन, सय्यद असरोद्दीन, हाफीज गणीसाहब, सय्यद मोबीदीन, मसाया, सय्यद हासिफसेठ, सय्यद नसोद्दीन,शेख नदीम, अब्दुल जफर, अख्तर शेख, मोहसीन शेख, मोमीन जुनेद यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मतदारांशी संवाद साधताना आ. विजयसिंह पंडित पुढे म्हणाले की, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना राष्ट्रवादी काँग्रेसने मुस्लिम समाजाला सदैव न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. गेवराई शहरात शादीखानामुळे गोरगरीब परिवाराचे लाखो रुपये वाचतील, मुस्लिम समाजाच्या कब्रस्थानाला संरक्षण भिंतीचे बांधकाम केले, मुस्लिम समाजाचे इतर प्रश्नही यापुढील काळात मार्गी लावले जातील, जाती-धर्माचे राजकारण करून मते मागणाऱ्यांना त्यांची जागा दाखवा आणि येत्या २ डिसेंबरला घड्याळ चिन्हासमोरील बटन दाबून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितल दाभाडे यांच्यासह नगरसेवक पदाच्या सर्व उमुदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रचार रॅलीला प्रभाग क्र.६ मधील मतदारांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

## भाजप उमेदवार संध्या राजपूत यांचा 'हर घर संवाद'; वॉर्ड ०८-ब मध्ये विश्वासाचे नाते अधिक मजबूत करण्याचा संकल्प!



**प्रतिनिधी @ बीड**

नगरपरिषदेच्या निवडणुकीचा प्रचार सुरू असून, मतदारांशी थेट आणि भावनिक नातं जोडण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) वतीने वॉर्ड क्रमांक ०८-ब च्या उमेदवार श्रीमती संध्या राजपूत यांनी अनोखी 'संवाद मोहीम' सुरू केली आहे.केवळ मतांसाठी नव्हे, तर जनतेशी मनापासून नातं जपण्यासाठी आणि बीड शहराला विकासाची नवी दिशा देण्यासाठी संध्याताईंनी प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचा ध्यास घेतला आहे. त्या वॉर्डातील प्रत्येक गल्ली आणि घराला भेट देऊन मतदारांशी थेट संवाद साधत आहेत.वॉर्ड ०८-ब मध्ये 'विश्वासाचे नाते' मजबूत करून वॉर्ड क्र. ०८-ब मध्ये संध्या राजपूत यांच्या या संवादामुळे सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजा, प्रलंबित प्रश्न आणि वॉर्डाच्या विकासासंबंधी अपेक्षा त्या शांतपणे ऐकून घेत आहेत.यावेळी बोलताना संध्या राजपूत म्हणाल्या, मी केवळ उमेदवार म्हणून नाही, तर तुमच्या कुटुंबातील एक सदस्य म्हणून तुमच्या दारी आले आहे. आपला विश्वासाचं नातं अधिक मजबूत करण्याचा संकल्प घेऊन मी मैदानात उतरले आहे. वॉर्डातील प्रत्येक समस्येवर प्रभावी आणि कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मी तुमच्या सेवेसाठी तत्पर राहीन.या संवाद मोहिमेमुळे मतदारांमध्ये उमेदवाराबद्दलचा विश्वास अधिक दृढ होत असून, वॉर्ड क्र. ०८-ब मधील नागरिकांकडून संध्या राजपूत यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# नगराध्यक्ष पदासाठी अघोरी विद्दयेचा चा आधार घेणाऱ्या उमेदवार कोण

**शेवगांव मध्ये नगराध्यक्षपदासाठी आपलीच निवड व्हावी म्हणुन एका उमेदवाराने पाचारण केले अघोरी विद्या जाणणाऱ्या बाबाला पाचारण करून केली शहर प्रदक्षिणा ?**

**प्रतिनिधी @ अहिल्यानगर**

शेवगांव नगरपरिषद निवडणुकीत आपलाच विजय निश्चित व्हावा यासाठी कोण काय करेल याचा नेम नाही काहींनी पक्ष बदलले काहींनी अपक्ष भरले तर काहींच्या घरी महाराज अवतरले आणि शेवगांवचे आख्खे मतदार मंतरले ? शेवगांव नगरपरिषदेचे वातावरण ऐन हिवाळ्यात चांगलेच गरम झाले असून साम दाम दंड भेद नीती वापरून विजय आपलाच कसा होईल व शेवगांव शहर माझ्याच कस ताब्यात राहील यासाठी काहींनी आपले नेते पाण्यात ठेवले तर काहींनी देव पाण्यात ठेवले तर विजय मिळविण्यासाठी शेवगांव मध्ये नगराध्यक्षपदासाठी आपलीच निवड व्हावी म्हणुन एका उमेदवाराने पाचारण केले अघोरी विद्या जाणणाऱ्या बाबाला पाचारण करून केली शहर प्रदक्षिणा ? आणि शहर मंतरून टाकले शेवगांव नगरपरिषद निवडणुकीत आपलाच विजय निश्चित व्हावा यासाठी कोण काय करेल याचा नेम नाही काहींनी पक्ष बदलले काहींनी अपक्ष भरले तर काहींच्या घरी महाराज अवतरले त्यांनी अवघ्या शहरातच चारचाकीने महाराज गाडीत घालून वेढा मारला व शहरातील मतदारच वश करून मलाच नगराध्यक्ष होऊ दे अशी अघोरी मागणी देवाकडे केली. अशी जोरदार चर्चा शेवगांव शहरात सुरु असून तो शहराची पूजा मांडणारा कोण ? मला दोन हाना पण नगराध्यक्ष म्हणा अश्या वृत्तीचा कोण ? पूछता है सर्वसामान्य शेवगांवकर

# पोलिसाच्या कारच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू:पाटोदा तालुक्यातील दासखेड फाट्यावर अपघात

पाटोदा /प्रतिनिधी

पोलिसाच्या मालकीच्या भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. यात दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. हा अपघात पाटोदा तालुक्यातील दासखेड फाटा येथे शनिवारी सायंकाळी साडेसहा ते सात वाजेच्या दरम्यान घडला. अतुल श्रीराम घरत (२३, रा. महाजनवाडी, ता. बीड) असे अपघातात मृत तरुणाचे नाव आहे.

अतुल दुचाकीवरून पाटोद्याहून गावी जात असताना पाटोद्याहून बीडकडे जाणाऱ्या भरधाव कारने (एमएच ४४ झेड ८८५९) त्याच्या दुचाकीला (एमएच २३ बीबी १२४१) पाठीमागून जोराची धडक दिली. भरधाव कारने अतुलला २०० ते २५० मीटर अंतरापर्यंत फरफटत नेले. त्यामुळे हेल्मेट घातलेले असतानाही अतुल याला गंभीर मार लागला. अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून पळून गेला. दरम्यान, कारमध्ये पोलिसाचा गणवेश आढळून आला. त्यावर लहू वासुदेव आंधळे नावाची नेमप्लेट होती. त्यामुळे कारमालक कोण याचा शोध लागला. जखमी अतुल याला बीड येथील रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला, मात्र रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर रविवारी पाटोदा पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी मोठी गर्दी जमली होती. पोलिसाची वर्दी असलेल्या गाडीने अपघात करून चालक पळून गेल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला. या प्रकरणात सुनील बबन चौरे (रा. सोनेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चालक लहू वासुदेव आंधळे याच्यावर निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश पवार हे करीत आहेत. मृत अतुल हा मराठा आरक्षण आंदोलनात सक्रिय होता. मराठा सेवक म्हणून त्याची ओळख होती. त्याच्या अपघातानंतर मोठ्या प्रमाणावर तरुणांची गर्दी झाली होती.

# बीड नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रतिबंधक आदेश लागू

**प्रतिनिधी @ बीड**

आगामी नगरपरिषद निवडणुका सुरळीत आणि शांततेत पार पडाव्यात, यासाठी बीड जिल्ह्यात प्रतिबंधक आदेश जारी करण्यात आले आहेत. कोणताही अनावश्यक तणाव किंवा गोंधळ निर्माण होऊ नये, तसेच कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, या हेतूने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.अतिरिक्त जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी हा आदेश प्रसिद्ध केला असून तो १७ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपासून १ डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहे. या कालावधीत पाच किंवा त्याहून अधिक व्यक्तींनी परवानगीशिवाय एकत्र येण्यास मनाई करण्यात आली आहे. मोर्चे, धरणे, निदर्शने, आंदोलन, उपोषणे आदी कार्यक्रमांसाठी प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांकडून अनेक ठिकाणी आंदोलनांची किंवा मोर्चांची शक्यता वर्तविली जात आहे. अशा परिस्थितीत क्षुल्लक कारणावरूनही तणाव निर्माण होऊ शकतो. त्याला आळा घालण्यासाठी आणि शांतता राखण्यासाठी हा आदेश महत्त्वाचा ठरणार आहे, असे प्रशासनाचे मत आहे.

## ‘ही-मॅन’ची एक्झिट चटका लावणारी,
# चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई ।प्रतिनिधी

भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा ही-मॅन म्हणून लौकिक मिळवेलेले ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.शोकसंदेशात मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचा हिंदी चित्रपट सृष्टीतला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण राहिला आहे. कृष्ण-धवल काळ ते रंगीत आणि अलिकडच्या तांत्रिकदृष्ट्या आधुनिक प्रवाहात ते कार्यशील राहिले. ते चित्रपटसृष्टीतील बदलाचे, भरभराटीपासून ते आतापर्यंतच्या काळाचे महत्वाचे साक्षीदार राहिले. नायक म्हणून तरूण वयात सालस, स्वप्नाळू नायक ते विविध चित्रपटात वाट्याला आलेल्या भूमिका त्यांनी अभिनयाने आयकॉनिक ठरवल्या. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत. मध्यंतरी त्यांनी लोकसभेत भारतीय जनता पक्षाचे खासदार म्हणून बिकानेरचे प्रतिनिधीत्व केले होते. पण त्यांनी चित्रपटसृष्टी आणि अभिनय, या क्षेत्रातील प्रयोगशीलता यांनाच अधिक प्राधान्य दिले. सुमारे तीनशेहून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या. एकाच वर्षांत नऊ हिट चित्रपट देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले. त्यांच्या निधनाने आपल्या चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला आहे.

ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनामुळे देओल कुटुंबीयांसह, त्यांच्या चाहत्यांवर दुःखाचा आघात झाला आहे. आम्ही या सर्वांच्या दुःखात सहभागी असून त्यांना ईश्वराने आघात सहन करण्याची ताकद द्यावी, अशी प्रार्थना करतो. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनामुळे चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

## ही-मॅन’ची एक्झिट वेदनादायक.. सांस्कतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार

मुंबई ।प्रतिनिधी

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, पद्मभूषण धर्मेंद्र यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायक आहे. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वाने, प्रभावी संवादशैलीने आणि हृदयाला भिडणाऱ्या अभिनयाने त्यांनी भारतीय सिनेमाला एक वेगळं स्थान प्राप्त करून दिले. ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारत त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आणि बॉलिवूडचा ही-मॅन अशी एक वेगळी ओळख प्रस्थापित केली.आज जरी एक सुवर्णयुग संपले असले, तरी धर्मेंद्र यांच्या अभिनयाची आणि संस्कारांची अमिट छाप सदैव आपल्या स्मरणात राहील.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, अशा शब्दात माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

# अंबड शहरातील प्रभाग ६ मध्ये रासपचा वाढता प्रतिसाद

**सचिन खरात आणि खुर्शीद जिलाणी यांच्या जनसंपर्काने बदलली राजकीय समीकरणे**

## जनतेचा कौल विकास हवा तर सचिन हवा

अंबड ।प्रतिनिधी

अंबड शहरातील प्रभाग क्र. ६ मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने नगरसेवक पदासाठी सचिन खरात आणि खुर्शीद जिलाणी यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताच राजकीय वातावरणात प्रचंड उलथापालथ झाली आहे. अर्ज दाखल होताच या दोघांच्या नावाभोवती उत्सुकतेचे वर्तुळ तयार झाले आणि जनसंपर्क सुरू होताच सामान्य नागरिकांचा मिळणारा जबरदस्त प्रतिसाद पाहता ही निवडणूक प्रभाग ६ मधील राजकीय समीकरणे बदलणारी ठरणार अशी चर्चा जोरात सुरु झाली आहे. सर्व समाजात जुळलेली घट्ट नाळ आपलेच माणूस अशी ओळख सचिन खरात आणि खुर्शीद जिलाणी हे दोघेही प्रभागातील सर्व समाज बांधवांमध्ये मुक्तपणे मिसळणारे सर्वांसोबत संकट सुखात धावून जाणारे नेतृत्व म्हणून ओळखले जातात.गोर-गरीबांच्या अडचणीत धावून जाणे कोणत्याही प्रसंगी मदतीसाठी रात्री-अपरात्री उपलब्ध राहणे आणि समाजात भेदभाव न करता सर्वांसोबत असणारी त्यांची लोकाभिमुख शैली नागरिकांना भावल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. घराघरांत भेटीदरम्यान मिळणारा विश्वास तरुण मतदारांचा वाढता कल, तसेच महिला मतदारांचा मोठा पाठिंबा यामुळे विरोधकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नेता नाही आपला माणूस अशी त्यांची प्रतिमा आज प्रभागात ठामपणे उभी राहिली आहे. विकासाचा ठोस अजेंडा कामगिरीची दमदार छाप प्रभाग ६ मधील पायाभूत सुविधा वीज-लाईट समस्या स्वच्छता, रस्त्यांची दुरुस्ती,पाणीपुरवठा असे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी सचिन खरात आणि खुर्शीद जिलाणी यांनी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा केला.निव्वळ राजकारण न करता कार्यक्षम,विकासाभिमुख नेतृत्व म्हणून त्यांनी स्वतःला सिद्ध केले आहे.तरुणांसाठी रोजगार उपक्रम प्रभागातील तरुणांचे प्रश्न समजून घेत त्यांच्या हाताला काम मिळावे यासाठी रोजगारक्षम उपक्रम,मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष संधी उपलब्ध करून देण्यात हे दोन्ही नेते नेहमी पुढे असतात. त्यामुळे तरुण वर्गात त्यांची मजबूत पकड निर्माण झाली आहे. जनसंपर्कात उडालेला




धुरळा निवडणूक रंगात सध्या प्रभाग ६ मध्ये सचिन खरात आणि खुर्शीद जिलाणी यांच्या प्रचाराचा जोर प्रचंड वाढला आहे. गल्ली-बोळांत नागरिकांचा उत्साह,भेटीत मिळणारा आशीर्वाद, चौकात होणाऱ्या चर्चेत उमटणारा एकच सूर विकास हवा तर सचिन खरात हवा या सकारात्मक लाटेमुळे प्रभागातील राजकीय वातावरण तापले असून निवडणूक रंगतदार बनली आहे. प्रभागात या दोघांच्या प्रवेशाने यंदा चुरस तुफान वाढली असून विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे संपूर्ण अंबडचे लक्ष लागले आहे.

# पालकांनी आपल्या पाल्याच्या बाबतीत दक्ष रहावे - प्राचार्य भक्तराज पौळ

**शाळा आपल्या दारी या उपक्रमांतर्गत उमापूर शाळेची बोरिपिंपळगाव येथे भेट**

पालकांशी संवाद साधून घेतला शैक्षणिक कार्याचा आढावा

**प्रतिनिधी @ गेवराई**

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. ज्याला स्पर्धेत यशस्वी व्हायचं आहे त्याने सातत्य जिद्द आणि चिकाटीने प्रयत्न करुन अभ्यासाच्या जोरावर यश मिळवले पाहिजे. तसेच गावचे वैभव है तेथील शाळेवर अवलंबून असते. तर पालकांनी आपल्या पाल्यांच्या बाबतीत दक्ष राहून पाल्याला शिस्त ,वेळेचे बंधन, मेहनत करण्याची इच्छा शक्ती याबाबत मार्गदर्शन करुन पाल्यांना वेळ दिला पाहिजे. तसेच पालकांनी शाळा व शाळेतील शिक्षकांच्या संपर्कात राहून पाल्याचा शैक्षणिक गुणवत्ता वाढीविषयी चर्चा केली पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य भक्तराज पौळ यांनी केले.



जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, उमापुर यांच्या वतीने शाळा आपल्या दारी या उपक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात माध्यमिक विद्यालयाच्या वतीने शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष तथा युवा नेते रणवीर अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य भक्तराज पौळ यांच्या प्रमुख उपस्थितीत बोरिपिंपळगाव येथे पालक संवाद बैठक संपन्न झाली. यावेळी पालकांशी संवाद साधून शैक्षणिक कार्याचा आढावा घेण्यात आला तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीविषयी चर्चा करण्यात आली. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरीक, पालक तसेच शाळेचे शिक्षक वृंद उपस्थित होते.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज पौळ यांनी विद्यार्थ्यांची प्रगती तसेच गुणवत्ता वाढीविषयी पालकांशी संवाद साधला या उपक्रमांचा उद्देश शिक्षणाचा दर्जा सुधारणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढवणे हा राहिला. बैठकीत पालकांशी विद्यालयाचे प्राचार्य भक्तराज पौळ, नरुटे सर, धोत्रे सर यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेविषयी सविस्तर चर्चा केली. यावेळी विद्यालयाचे शिक्षक भिलगुडे सर, खरात सर, बागडे सर, घारगे सर, पवार सर, उपस्थित होते. भेटीमध्ये पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता तर शाळेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. तर पालक संवाद बैठकीच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.




आज हजरत ख्वाजा मजहाबोदीन दर्गा शरिफ केज येथे सरकार ग्रुप तर्फे हजरत टिपू सुलतान जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते यानिमित्त रक्तदान करतांना माजी नगराध्यक्ष कबीरभाई इनामदार सोबत माजी उपनगरध्यक्ष दलीलभाई इनामदार व सर्व मित्र परिवार





## स्वच्छता कर्मचारी महिलेचा आदर्श प्रामाणिकपणा ;सापडलेले १० लाख केले परत...

**प्रतिनिधी @ पुणे**

याबाबत अधिक माहिती अशी की, स्वच्छता कर्मचारी अंजू माने या नेहमीप्रमाणे सदाशिव पेठ भागात २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून दारोदार जाऊन कचरा गोळा करण्याचे काम करत होत्या. गोळा केलेला कचरा फिडर पॉईंटला आणतांना अंदाजे ८ ते ९ च्या दरम्यान त्यांना रस्त्याच्या कडेला एक बॅग पडलेली दिसली.यापूर्वीही अशाच औषधाच्या बॅग मिळाल्याचा अनुभव अंजू यांना होता.म्हणून तशीच कोणाची बॅग असेल असा विचार करून त्यांनी ती बॅग फीडर पॉइंटला सुरक्षित ठेवली. पण बॅग उघडून पाहिल्यानंतर औषधांसोबत त्यात रोख रक्कम असल्याचे त्यांच्या लक्षात आले. गेली जवळपास २० वर्षे त्या ह्या भागात काम करत असल्यामुळे अंजू यांना परिसरातील सर्व नागरिकांना ओळखतात. त्यांनी ओळखीतील नागरिकांच्या मदतीने परिसरातील सर्वांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

या दरम्यान एक नागरिक (त्यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचे नाव व ओळख उघड करू शकत नाहीत असे या प्रामाणिक महिलेने सांगितले.) अतिशय अस्वस्थपणे काहीतरी शोधत असल्याचे अंजूताईंनी पाहिले. त्यांनी त्या नागरिकाला बोलवून, आधी पाणी देऊन शांत करण्याचा प्रयत्न केला आणि सापडलेली बॅग त्यांचीच असल्याचे निश्चित करून दहा लाख रक्कम असलेली बॅग जशीच्या तशी परत केली. नागरिकानी देखील अंजूताईंच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करण्यासाठी त्यांना साडी व काही रोख रक्कम देऊन त्यांचा परिसरातील सर्व नागरिकांच्या साथीने सत्कार केला.

# सौ.संध्याताई दीपक देशमुख व आघाडी मित्रपक्ष यांच्या प्रचाराचा खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून शुभारंभ

**भव्यदिव्य रॅलीने सध्याताई दीपक देशमुख यांच्या विजयावर केला शिक्कामोर्तब**

मतदारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादावरून परिवर्तनाची चाहूल

भ्रष्टाचार मुक्त परळी आणि दहशतमुक्त परळी खासदार बजरंग बप्पा यांचे परळीकरांना वचन

**प्रतिनिधी @ परळी**





परळी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा भव्य शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट)च्या उमेदवार सौ. संध्याताई दीपक देशमुख यांच्या प्रचार कार्यालयापासून करण्यात आला. खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते या प्रचार मोहिमेची सुरुवात झाली. राज्याचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे नेते दीपक रंगनाथ देशमुख, पक्षाचे प्रभारी डॉ.नरेंद्र काळे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

प्रचार शुभारंभ कार्यक्रमात सर्वप्रथम मोंढा येथील हनुमान मंदिरात विकसित परळीच्या संकल्पपत्राचे प्रकाशन करण्यात आले. श्रीफळ फोडून आणि आझाद नगर येथील दर्ग्यावर चादर अर्पण करून प्रचाराची औपचारिक सुरुवात झाली. संकल्पपत्रात सुंदर परळी - स्वच्छ परळी, दहशत-मुक्त शहर, महिला सुरक्षा या मुद्द्यांना विशेष प्राधान्य देण्यात आल्याचे दिसून आले. गणेश पार येथून रॅलीची सुरुवात झाली. पुढे ही रॅली राणी लक्ष्मीबाई टॉवर, मोंढा मार्केट, एकमिनार चौक, स्टेशन रोड मार्गे पुढे सरकत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. शेवटी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्य कार्यालयात रॅलीचा समारोप झाला.

भव्यदिव्य प्रचार रॅलीने शहरवासीयांचे मोठे लक्ष वेधले. नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादावरून ‘परिवर्तन अटळ’ असल्याची भावना शहरात उमटल्याचे चित्र पाहायला मिळाले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, शहराध्यक्ष, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उत्तम माने, शंकर शेजुळ, बाबा शिंदे, ॲड. जीवनराव देशमुख, सय्यद फिरोज, वर्षा रायभोळे, कल्पना देशमुख, प्रकाश देशमुख यांच्यासह असंख्य पदाधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली.

प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते झाले. यावेळी, पक्षाचे निरीक्षक नरेंद्र काळे ,प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते दीपक रंगनाथ देशमुख, तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, नेते उत्तम माने यांच्या प्रमुख उपस्थितीत लाल फिती कापून,श्रीफळ फोडून उद्घाटन करण्यात आले.यावेळी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी राजकीय व्यासपीठावरील पहिल्याच भाषणात जिंकली सर्वांची मने !

## मी उतणार नाही,मातणार नाही, परळीच्या जनसेवेचा घेतलेला वसा टाकणार नाही' - सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

परळी (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत परळीत आज ना पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे आणि महायुतीच्या नेत्यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा झाला. तसेच प्रत्यक्ष जाहीर प्रचाराचा शुभारंभही करण्यात आला. यावेळी झालेल्या प्रचंड जाहीर सभेत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी राजकीय व्यासपीठावरील पहिलेच भाषण केले. पहिल्याच भाषणात त्यांनी व्यासपीठावरील नेत्यांसह सर्वच उपस्थितांची मने जिंकली त्यांच्या भाषणाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. यावेळी त्यांनी 'मी उतणार नाही,मातणार नाही, परळीच्या जनसेवेचा घेतलेला वसा टाकणार नाही असा एकच शब्द देते असे म्हणत अश्वासक विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व मित्रपक्ष महायुतीच्या जाहीर प्रचार शुभारंभ व महायुतीचा संयुक्त कार्यकर्ता मेळावा झाला. यावेळी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी अगदी मुद्देसूद,संयमित व परळीच्या विकासात्मक वाटचाल याची गुंफन करत भाषण केल्याचे दिसून आले. त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले की,या नगरपरिषद निवडणुकीत, नगराध्यक्ष पदासाठी महायुतीची अधिकृत उमेदवार म्हणून मी आपल्यासमोर उभी आहे. व्यासपीठावर एवढे दिग्गज नेते उपस्थित आहेत. एवढ्या मोठ्या राजकीय व्यासपीठावर आणि एवढ्या मोठ्या जनसमुदायासमोर प्रथमच आपण भाषणासाठी उभे असल्याचे सांगत राज्याचे दोन दमदार नेतृत्व, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे व माजीमंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजयजी मुंडे,महायुतीचे सर्व नेतेगण यांनी माझ्यावर नगराध्यक्षपदाची उमेदवार म्हणून विश्वासाने जबाबदारी टाकली आहे. परळीकर मायबाप जनतेचा आशीर्वाद मिळवून हा विश्वास आपण सार्थ करुन दाखवू अशी ग्वाही दिली.



पुढे बोलतांना सौ.पद्मश्रीताई यांनी सांगितले की, ही निवडणूक केवळ निवडणूक नाही तर ही निवडणूक परळीच्या भविष्याची निवडणूक आहे. विकासीत शहराची दिशा ठरविण्याची ही निवडणूक आहे.आपलं शहर व शहरातील नागरी जीवन सुनियोजित, सुसह्य व समृद्ध कसे होईल हा दृष्टिकोन दृढ करण्याचा आपला प्रयत्न राहील.शहर विकासाची दृष्टी आणि दृष्टिकोन आपल्या महायुतीच्या दोन्ही दमदार नेतृत्वांकडेच आहे. त्यामुळे सुज्ञ परळीकर महायुतीला भरघोस मतांनी विजयी करुन नगर परिषदेवर महायुतीचाच झेंडा फडकवतील याचा खंबीर विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

पहिल्याच भाषणात मी मोठमोठी अश्वासने आणि निवडणूकीपुरती डायलॉगबाजी करणार नाही असे म्हणत मला एवढंच माहित आहे की, धनंजय मुंडे आणि पंकजाताई मुंडे हेच खऱ्या अर्थाने परळीच्या विकासाचा 'समृद्धी महामार्ग' आहेत. परळीच्या विकासाचा प्रवास याच मार्गावरुन गती आणि प्रगतीने होवू शकेल.याची १०० टक्के 'गॅरंटी' माझ्यासह आपल्या सर्वांना आहे. परळीकर नागरीकांचा या नेतृत्वावर खंबीर विश्वास आहे, त्याचबरोबर माझे पती माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांची कार्यपद्धी, एक कार्यकर्ता म्हणून निरंतर लोकांच्या कामातील त्यांचं समर्पण, परळीकरांच्या सुख दुखाची सहवेदना आणि परळीसाठीची प्रामाणिक तळमळ, माझ्यापेक्षाही तमाम परळीकरांना माहित आहे असे सांगून त्यांनी त्याच परंपरेतून, नव्या उत्साहाने आणि नव्या दृष्टिकोनाने परळीच्या विकासासाठी निरंतर प्रामाणिकपणे काम करण्याचा माझा निर्धार असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परळीकरांना आवाहन करतांना त्यांनी सांगितले की,आज मी तुमचं प्रेम, तुमचा विश्वास, आणि तुमचा आशिर्वाद मागायला आलेली आहे. विकासाची गती आणि परळीची प्रगती हा संकल्प घेऊन आलेली आहे. परळीकरांची सेवा,विकास व विश्वास हे अभिवचन देण्यासाठी आलेली आहे. पंचम ज्योतिर्लिंग वैद्यनाथाच्या परळीचा जपुन वारसा - चौफेर आणि सर्वंकष विकासाचा घेऊन वसा मी आपल्याला आपले मतरुपी आशीर्वाद मागत आहे. परळीकर मायबाप जनता मला नगराध्यक्षपदाला व महायुतीच्या सर्व उमेदवारांना भरभरून मते देवून विजयी करतील असा विश्वास व्यक्त करते. यासाठी एक आपली सुन म्हणून, लेक म्हणून, बहिण म्हणून आपण मला आशीर्वाद द्यावेत. आम्हास सेवेची संधी द्यावी.परळीच्या दोन्ही दमदार नेतृत्वाचे हात बळकट करावे. मी उतणार नाही,मातणार नाही, परळीच्या सेवेचा घेतलेला वसा टाकणार नाही एवढा एकच शब्द देते असे म्हणत तमाम परळीकरांना पद्मश्रीताईंनी यावेळी विजयाची साद घातली.

## निवडणुकीतील अनुचित प्रकार रोखण्यासाठी निवडणूक आयुक्तांनी लक्ष घालावे - सौ.संध्या देशमुख

परळी ।प्रतिनिधी

मागील लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुकीत बुथ ताब्यात घेण्यात आले होते.तोच प्रकार परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत पुन्हा घडण्याची शक्यता असल्याने त्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सध्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांना ठेवू नये. तसेच, निवडणुकीत अनुसूचित प्रकार घडू नये, पुन्हा तेच अधिकारी लाकटर, कांबळे, सालगडी म्हणून काम करीत आहेत . त्यांच्या जागी इतर अधिकाऱ्यांची नेमणूक करावी अशी मागणी केली आहे.




मतदारांना भयमुक्त मतदान करता यावे आणि लोकशाही मार्गाने नगराध्यक्ष निवडला जावा.केवळ दादागिरी करून बुथ ताब्यात घेणार्यांचा बंदोबस्त करावा. तसेच, पोलिस यंत्रणा सुध्दा त्याच्या हाताखालचे बाहुले झाली आहे.त्यामुळे पोलिस यंत्रणा बाहेरच्या राज्यातून बोलवावी , प्रत्येक बुथवर सीसीटीव्ही बसवावेत. निवडणुकीतील हा अनुचित प्रकार रोखण्यासाठी निवडणूक आयुक्तांनी लक्ष घालावे अशी मागणी परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक नगराध्यक्ष पदाच्या, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या उमेदवार सौ.संध्या दिपक देशमुख व दिपक रंगनाथ देशमुख यांनी सदरील निवेदनात केली आहे.

## सोळंके मोठे आहेत पण खोटे आहेत -बाबुराव पोटभरे

माजलगाव (रविंद्र राऊत)

माजलगाव नगरपालिकेचा निवडणुक चांगलीच रंगात आली आहे.प्रभाग क्र.२चे उमेदवारासाठी रात्री ७वा. दि.२३रविवार रोजी झालेल्या कॉर्नर बैठकीत आरोप प्रत्यारोपामुळं चांगलीच रंगात आली आहे.यावेळी मोहन जगताप,बाबुराव पोटभरे, सहाल चाऊस,विश्वाभर थावरे,मिलिंद आवाड,तालेब चाऊस,सुनील शिंदे,यादव, जावळे व इतर उवस्थित होते.

यावेळी बाबुराव पोटभरे म्हणाले कि,आ.सोळंके हे मोठे आहेत पण खोटे आहेत, म्हणुन त्यांचे विषयी लबाड लांडग ढोंग करतंय असे म्हणले तर काही वावगं होणार नाही.माजलगाव नगरपालिका व त्याचा पुर्ण कारभार हा त्यांचेच अधिकारात होता. त्यांना या कारभाराबाबत पुर्ण माहिती असूनही ते सोंग करत आहेत.मतदार संघातील कोणतेही कामे असोत त्या कामात त्यांचे कमिशन ठरलेले आहे.मग जनतेला ते भुलथापा देतात.मोहन जगताप म्हणाले कि, शहरातील प्रत्येक नगरसेवकाकडून सतरा टक्के कमिशन खाणाऱ्याना घरचा रस्ता दाखवा या नगरांचा चेहरा मोहरा बदलायचा असेल तर तुतारीला मतदान करा.सहाल चाऊस म्हणाले कि,आ.सोळंकेनि फॉर्म भरण्यासाठी त्रास दिला. तहसील मध्ये दोन तास बसुनही त्यांचा मतीतार्थ पुर्ण झाला नाही.आमचे अर्ज फेटाळणे साठी पदाचा दबाव आणत होते.



मिलिंद आवाड म्हणाले कि, शहरातील असे कामे करा कि, उद्या रात्यावरून जाताना एखाद्या व्यक्तीचा फोन सहाल भैया यांना फोन आला तर तो रस्ता ताबडतोब पुर्ण झाला पाहिजे,शहरातील पाण्याबाबत तालेबचाऊस ला फोन आला तर ते पुर्ण काम झाले पाहिजे,तसेच कचऱ्याबाबत यादव ला फोन आला तर तो कचरा लागलीच मार्ग निघाला पाहिजे, या प्रभागात एखाद कुत्र मेल अन नागरिकांचा फोन आला कि येथे लई वास येतो तर सचिन जावळे यांनी ते कुत्र उचलण्याची तरतूद झाली पाहिजे.असा सल्ला त्यांनी या उमेदवारांना दिला.यावेळी मोहन जगताप, बाबुराव पोटभरे,सहाल चाऊस,नारायणराब डक, विश्वाभर थावरे,मिलिंद आवाड,तालेब चाऊस,सुनील शिंदे व इतर हजर होते.

# बाचाबाची व तणावपूर्ण वातावरणात सासरी घरासमोरच केला डॉ.गौरी गर्जे यांचा अंत्यविधी

## न्यायालयाने अनंत गर्जेला ३ दिवसाची सुनावणी पोलिस कोठडी

बीड ।प्रतिनिधी

मंत्री पंकजा मुंडे यांचा खाजगी स्वीयसहाय्यक यांच्या पत्नी गौरी गर्जे (पालवे) यांच्या अंत्यसंस्कारासाठी पाथर्डी तालुक्यातील मोहोज (देवडे) गावात दोन्ही गटात मोठा तणाव निर्माण झाला. अखेर तीन तासांनी दोन्ही बाजूच्या प्रमुख लोकांनी केलेल्या मध्यतीमुळे घरासमोर ताणावपूर्ण वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी नीरज राजगुरू यांच्यासह मोठा पोलिस फौजफाटा उपस्थित होता.

दरम्यान डॉ. गौरी गर्जे हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी डॉ. अनंत गर्जे ला तीन दिवसाची पोलिस कोठडी ठोठावली आहे.

दि.२२ नोहेंबर २०२५ रोजी गौरी



अनंत गर्जे (पालवे) यांचा मृत्यूची बातमी माध्यमात आल्याने खळबळ उडाली होती. गौरीचा दोन महिन्यापासून शारीरिक आणि मानसिक छळ सुरू होता. अनंत गर्जे विवाहबाह्य संबंध होते यामुळे वाद वाढल्याने फाशी घेऊन आत्महत्या केली की? हत्या केली? याविषयी आरोप प्रत्यारोप होत आहे.

मुंबईतील वरळी पोलिस ठाण्यात वडिलांचे तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. शव विच्छेदनानंतर गौरीचे सासरे भगवान गर्जे, वडील डॉ. अशोक पालवे आणि त्यांच्या नातेवाईकाने पाथर्डी तालुक्यातील मोहोज (देवडे) येथे सोमवारी सकाळी ७.१५ पार्थिव घेऊन आले.

स्व. गौरी यांच्या माहेर कडील नातेवाईक मोठ्या संख्येने अंत्यविधीसाठी उपस्थित झाले. प्रारंभी पासून मोठा तणाव निर्माण झाला होता. सुरुवातीला बंगल्याच्या दारात सरण रचण्याचा प्रयत्न झाला. मात्र काही प्रतिष्ठित आणि जाणकारांनी हस्तक्षेप केल्यामुळे घराच्या क्षम डाव्या बाजूच्या १० फूट अंतरावर सरण रचण्यात आले. गौरीचे पार्थिव घराच्या बाहेर आणण्यातही डॉक्टर भावाचा विरोध. करत असल्याचे पोलीस निरीक्षक यांनी सांगितल्यानंतर पार्टी अंत्यविधीसाठी बाहेर आणण्यात आले. अखेर तीन तासाच्या तणावात सासरे भगवान गर्जे यांनी भडाग्नी दिला.जेव्हा उपयोगाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजपूत, पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक मुंडे आदींनी घटनास्थळी तणावपूर्ण परिस्थिती कौशल्याने हाताळून दोन्ही बाजूंच्या नातेवाईकांना योग्य ते समजावून अंत्यविधी करून घेण्यासाठी प्रयत्न केले.

अनंत गर्जेला ३ दिवसाची कोठडी

डॉ. गौरी गर्जे हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अनंत गर्जे रविवारी रात्री उशिरा १.०० वाजता वरळी पोलिस ठाण्यात हजर झाल्याने त्याला अटक करण्यात आली. सोमवारी न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावणी आहे.

## कदमवाडी येथील शिक्षणप्रेमी ज्येष्ठ नागरिक बप्पासाहेब कदम यांनी स्वखर्चातून पाटोदा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी केला रस्ता



बीड (प्रतिनिधी)

तालुक्यातील कदमवाडी येथील शिक्षणप्रेमी ज्येष्ठ नागरिक श्री बप्पासाहेब कदम यांनी रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या बाभळीमुळे अपघात रोखण्यासाठी तसेच परीसरातील शालेय विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांच्या दळणवळणाची सोय व्हावी यासाठी पाटोदा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना शाळेचा प्रवास सुखकर करण्यासाठी स्वखर्चातून रस्त्यांच्या वळणावर असणारे झाडे जेसीबीच्या साह्याने बाजूला काढून विद्यार्थ्यांच्या शाळेच्या बससाठी रस्ता मोकळा केला. त्यांचे हे सामाजिक कार्य कौतुकास्पद असल्याचे पाटोदा हायस्कूलचे मुख्याध्यापक धनवंत मस्के सर यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी परिसरातील ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले.

## ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

**मुंबई ।प्रतिनिधी**

**हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनाने भारतीय चित्रपटसृष्टीतील एका तेजस्वी पर्वाचा अंत झाला असून, अभिनयाचा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.**

### चित्रपटसृष्टीतील अभिनयाचा 'ही-मॅन' काळाच्या पडद्याआड - उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, धर्मेंद्र यांच्या अभिनयात नैसर्गिकता, साधेपणा आणि मनाला भिडणारी भावनिक ताकद होती. 'शोले', 'चुपके चुपके', 'अनुपमा', 'सत्यकाम', 'दिललगी' अशा अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहेत. विशेषतः 'शोले'मधील त्यांनी साकारलेली 'वीरू'ची भूमिका रसिकांच्या मनात अजरामर आहे. धर्मेंद्र यांचा चित्रपट प्रवास म्हणजे मेहनत, समर्पण आणि कलाविश्वाप्रती असलेल्या निःस्वार्थ प्रेमाचे प्रतीक आहे. त्यांनी अनेक पिढ्यांतील प्रेक्षकांना आपल्या अभिनयातून निखळ आनंद दिला. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे.

धर्मेंद्र यांनी आपल्या दीर्घ आणि उल्लेखनीय कारकिर्दीत आठ वेळा 'फिल्मफेअर पुरस्कार' मिळवले होते. त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वामुळे आणि दमदार अभिनयामुळे त्यांना 'हिंदी सिनेमा'चा 'ही-मॅन' म्हणून ओळख मिळाली होती. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपट सृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कुटूंबियांना, चाहत्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# संत सावता क्रांती परिषदेसह दशनाम गोसावी समाजाने भाजपाला दिला एकमुखी पाठिंबा

बीड /प्रतिनिधी

शहरातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात प्रभाग क्र.९ मधील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपजिल्हाप्रमुख राजू महुवाले, प्रभाग क्र.१ मधील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सुरेश शिंदे यांच्यासह कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि.२४) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. तसेच, संत सावता क्रांती परिषदेसह दशनाम गोसावी समाजाने एकमुखी पाठिंबा दिला आहे. या प्रवेशासह संघटनांच्या पाठिंबामुळे बीडमधील भाजपाची ताकद आणखी वाढली आहे.

भाजपच्या पक्ष कार्यालयातील प्रवेश कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे,




भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे, शहराध्यक्ष अशोक लोढा, प्रा.देविदास नागरगोजे, रवींद्र कदम, चंद्रकांत फड, सुनील मिसाळ, गणेश लांडे, बालाजी पवार, डॉ.लक्ष्मण जाधव, भूषण पवार, डॉ.अभय वनवे, डॉ.रमेश शिंदे, अक्षय रणखांब, नगरसेवक पदाचे उमेदवार परमेश्वर धारकर, दत्ता गायकवाड, मुकेश कुटे, महादेव नागरगोजे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपमध्ये झालेला हा प्रवेश आगामी निवडणूक प्रचाराला चालना देणारा ठरणार आहे.

आ.योगेश टिळेकर यांच्या संत सावता क्रांती परिषदेने दिला डॉ.ज्योती घुंबरेंना पाठिंबा

भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रवींद्र घुमरे यांना आमदार योगेशअण्णा टिळेकर यांच्या संत सावता क्रांती परिषदेच्यावतीने पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. पाठिंब्याचे पत्र परिषदेच्यावतीने सागर पाटील व पदाधिकाऱ्यांनी दिले आहे. दरम्यान, पाठिंबा दिल्याबद्दल डॉ.ज्योती घुंबरे यांच्यासह भाजपच्यावतीने परिषदेचे आभार मानले आहेत.

दशनाम गोसावी समाजाचा एकमुखी पाठिंबा

बीडमधील खासबाग देवी मंदिराचे ज्येष्ठ पुजारी दिवंगत दिगंबर विठ्ठल गिरी यांच्या तेरवीप्रित्यर्थ बीडमधील सोमेश्वर मंदिर येथे आयोजित कार्यक्रमानिमित्त डॉ.ज्योतीताई घुंबरे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी दशनाम गोसावी समाजाच्या समाधी भूमीच्या प्रलंबित प्रश्नाची माहिती जाणून घेतली. बीड जिल्ह्यातील गोसावी समाजाचा हा महत्त्वाचा प्रश्न असून तो मार्गी लावण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील, असे त्यांनी आश्वासन दिले. या भेटीवेळी दशनाम गोसावी समाजाचे बीड जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी, भाजप युवा नेते बालाजी पवार, दादासाहेब ननवरे, ड.जयश्री ढाकणे, गोसावी समाजाचे पदाधिकारी विश्वंभर गिरी, सिद्धेश्वर गिरी, विवेकानंद गिरी, उत्तरेश्वर भारती, मंदिर पुजारी मच्छिंद्र बन, मारुती गिरी, बबन गिरी

# परळीला बदनाम करणाऱ्यांना जनता मत रूपी आशीर्वाद देऊन उत्तर देईल - धनंजय मुंडे

## शेवटच्या माणसापर्यंत विकास पोचला पाहिजे, मी व धनु भाऊ मिळून त्यासाठी एकत्रित काम करू - ना. पंकजाताई मुंडे

परळी ।प्रतिनिधी

परळीच्या मातीतील जनतेची सेवा आणि विकास हाच आपला ध्यास ठेवून मागील अनेक वर्ष आम्ही काम करत आलो आहोत, मागील काही कार्यकाळ नगरपरिषदेत प्रशासक होता, मात्र तरीही विकास कामांसाठी निधी खेचून आणण्यात कुठेही कमी पडलो नाहीत. परंतु गेल्या काही महिन्यात राजकीय स्वार्थापोटी काही लोकांकडून परळीची राज्यात जी बदनामी करण्यात आली, तिचे चोख प्रत्युत्तर देण्यासाठी परळीतील जनता महायुतीच्या नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवारांच्या पाठीशी मतदान रोपे आशीर्वाद उभा करून भरघोस मतांनी विजयी करून देईल, असा विश्वास माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते आमदार धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केला.

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीच्या अधिकृत उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह युतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ आज महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संयुक्त कार्यकर्ता मेळावा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे सह आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता, या वेळी श्री. मुंडे बोलत होते.

पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करताना श्री धनंजय मुंडे म्हणाले की मी माझ्या जीवनात कोणतीही निवडणूक कधीच हलक्यात घेत नाही किंवा सोपी समजत नाही. आपणही या निवडणुकीला सोपे न समजता प्रत्येक मतदाराच्या घरापर्यंत पोहोचून आपल्या विकासाचे विजन मांडण्याची आणि शंभर टक्के मतदान करून घेण्याची जबाबदारी ही सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व सहकाऱ्यांची आहे. राज्यात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या स्वरूपाचे चित्र असताना सुद्धा परळी नगर परिषदेत मात्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) अशी स्पष्ट महायुती एकत्रित लढत



असून योग्य पद्धतीने जागावाटप करण्यात आले असून सर्वांनी एकत्रित महायुती म्हणून एकमेकांना सोबत घेऊन चालावे, अनेक विषयातील आपसातील मतभेद किंवा अन्य कोणत्याही असयुक्तिक बाबींचा निवडणुकीवर परिणाम होणार नाही याची कार्य काळजी सर्वपक्षीय सहकाऱ्यांनी घ्यावी असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. दरम्यान माझ्यासह धनंजय मुंडे यांच्या कार्य काळामध्ये परळी वैद्यनाथ शहरांमध्ये कृषी महाविद्यालय, पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय यासारख्या अनेक शासकीय शिक्षण संस्था उभ्या राहत असून आगामी काळात परळी विद्यानगरी होईल त्यालाच अनुसरून शहरांमध्ये आर्थिक उलाढाल देखील वाढेल, यातूनच विकासाला देखील गती प्राप्त होईल. विकास पोहोचला पाहिजे, असे ब्रीद हाती घेऊन स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी परळीच्या विकासासाठी काम केले. त्याचाच वसा घेऊन पुढे शेवटच्या माणसाच्या विकासासाठी शेवटच्या श्वासापर्यंत काम करत राहू आणि विकासाचे शहर अशी ओळख परळी शहराला करून देऊ असे मत पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. निवडून येणाऱ्या नगरसेवकांनी नेहमी गरिबांची कामे करावीत, गरिबांना कोणतीही जात नसते त्यामुळे नगरसेवकाची कामे दररोज जनता दरबार भरवल्याप्रमाणे दिसले पाहिजे अशी अपेक्षाही मंत्री पंकजाताई मुंडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त करून दाखवली. तीर्थक्षेत्र विकास आराखडा सह परळी शहरात अनेक विकासाची कामे सुरू आहेत तसेच अनेक कामे प्रस्तावित आहेत, वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत सुरू असलेली कामे येत्या वर्षभरात पूर्ण करायची आहेत. त्यासाठी विकासाचे व्हिजन असलेले लोक प्रतिनिधित्व करणे गरजेचे आहे, असेही धनंजय मुंडे याप्रसंगी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी केले, तसेच नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह शिवसेनेचे तालुकाध्यक्ष व्यंकटेश शिंदे, रिपाइंचे सचिन कागदे, राष्ट्रवादीचे प्रा. विनोद जगतकर, भाजपचे जुगलकिशोर लोहिया यांनीही याप्रसंगी आपले मत व्यक्त केले.

व्यासपीठावर ना. पंकजाताई मुंडे, आ. धनंजय मुंडे, जुगलकिशोर लोहिया, शांतीलाल जैन, विजय वाकेकर, अजय मुंडे, अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य तय्यब भाई शेख, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. मधुकर आघाव, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष व्यंकटेश शिंदे, रिपाइंचे सचिन कागदे, भाजपच्या शहराध्यक्ष उमाताई समशेट्टी काकी, सुरेश टाक, आयुब भाई पठाण विनोद जगतकर, संदीप लाहोटी, आर. एच. वावळे, निळकंठ चाटे, वैजनाथ माने, अरुण टाक, प्रकाश जोशी, अजीज कच्ची, रवींद्र परदेशी, राजेंद्र सोनी, श्रीहरी मुंडे, राम कुलकर्णी, महादेव इटके शरद मुंडे, तुळशीराम पवार, नितीन कुलकर्णी, पी. एल. कराड, सुनील नाना फड, यांसह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नगराध्यक्ष पदासह सर्व उमेदवार उपस्थित होते. यावेळी अपक्ष उमेदवारी दाखल केलेल्या वहाब कुरेशी, रवी मुळे तसेच बुंदेले यांनी संबंधित प्रभागातील महायुतीच्या उमेदवारांना आपला जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

---

# पाडळी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे निबंध स्पर्धेत सुयश

शिरूर कासार ।प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी हायस्कूल पाडळीच्या विद्यार्थ्यांनी. माजी मंत्री जयदतत्तजी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त इंग्रजी विभाग व वांङःमय मंडळाच्या विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत पाडळी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक शैक्षणिक साहित्यक विकासाशी निगडित विविध विषयावर निबंध स्पर्धेत उत्कृष्ट लिखाण करून राज्यस्तरीय उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केली.

यामध्ये सातवी मधून कु. इंगळे तेजल महादेव,दहावी मधून कु. वाघ विशाखा गोरख यांनी राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाची पारितोषिक मिळवले तर कु.पाखरे ज्ञानेश्वरी अशोक, खाडे सार्थक शिवाजी या दोन विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले .विजेत्यांना रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्रक सन्मान कार्यक्रम ६ डिसेंबर रोजी जयदत्तजी क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये वाटप केली जाणार आहेत. अशी माहिती आयोजक प्राचार्य डॉ. विश्वास कंदारे यांनी दिली. पाडळी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्तजी क्षीरसागर, प्रशासक डॉ. राजीवजी मचाले सहप्रशासक योगेश पवार , कार्यवाहक एम ए राऊत, प्राचार्य अंगदराव दहिफळे सरपंच गहिनाथ पाखरे , उपसरपंच किसन इंगळे,चेअरमन भगवान पाखरे. माजी सरपंच, रामदास हंगे, दत्ता अंवतकर , प्रकाश इंगळे, किरण चव्हाण,गोरख सानप, विनोद कंठाळे, पत्रकार नवनाथ सानप , उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे, माध्यमिक पर्यवेक्षक दीपक रत्नपारखी आदी सह ग्रामस्थ व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

---

# बीडमध्ये टीईटी परीक्षेचा पहिला बळी!

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कोल्हारवाडी येथील श्री शहागीर बाबा शाळेत कार्यरत असलेले शिक्षक राजाराम बाजीराव वळे यांनी शिक्षक पात्रता परीक्षा संबंधित वाढत्या तणावामुळे आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून शिक्षकवर्गात शोककळा पसरली आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की माहितीनुसार, राजाराम वळे नावाचे शिक्षक हे बीड तालुक्यातील कोल्हारवाडी येथील श्री शहागीर बाबा या शाळेमध्ये २२ - २३ वर्षापासून शिक्षक म्हणून कार्यरत होते. विद्यार्थ्यांमध्ये ते शांत, प्रेमळ आणि मार्गदर्शन करणारे शिक्षक म्हणून ओळखले जात. ते मागील काही दिवसांपासून ढएढ परीक्षेच्या तयारीत व्यस्त होते आणि सतत तणावाखाली होते. या तणावातूनच त्यांनी ढएढ परीक्षेच्या दिवशी म्हणजेच रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास स्वतःच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या घरच्यांना घटनेनेची तीन वाजण्याच्या सुमारास ही घटना माहिती झाली.

सदर घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला होता. सोमवार दिनांक २४ रोजी सकाळी त्यांच्या पार्थिवावर बीड शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पाठीमागे असलेल्या स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून शिक्षकवर्गात शोककळा पसरली आहे. या प्रकरणाची बीड ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

---

# नेमिनाथ गाडेकर पाटील यांचे दु:खद निधन

शिरूर कासार ।प्रतिनिधी

येथील रहिवाशी नेमिनाथ मारुती गाडेकर पाटील यांचे २३ रोजी दुपारी १ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८२ होते. नेमिनाथ गाडेकर पाटील यांना बापू या नावाने ओळखले जात असत. नेमिनाथ राव यांनी जीवनभर देवदानधर्म केला जुन्या काळी त्यांचे बॉम्बे टेलर्स दुकान होते. सुबक कपडे शिवण्याची त्यांची मोठी कला होती .हसत खेळत त्यांनी जीवनभर सर्वांशी आपुलकीचे नाते जोडले. नेमिनाथ राव यांच्या दुःखद निधनाची बातमी समजताच शिरूर शहरात दुखवठा पाळण्यात आला. नेमिनाथराव यांच्यावर शहरातील अमरधाम मध्ये अंतिम संस्कार



करण्यात आले. यावेळी शहरातील सर्व ग्रामस्थ व्यापारी नोकरदार पत्रकार नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यांच्या पश्चात रामेश्वर गाडेकर, शरद गाडेकर, धनंजय गाडेकर अशी तीन मुले आहेत. गाडेकर पाटील यांच्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

---

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी शहराध्यक्षपदी माजी उपनगराध्यक्ष अय्युब भाई पठाण यांची नियुक्ती

## मुंडे बंधू - भगिनींच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र

परळी (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या परळी शहराध्यक्षपदी माजी उपनगराध्यक्ष तथा परळी नगर परिषदेचे माजी पाणीपुरवठा सभापती आयुब भाई पठाण यांची आज नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सह मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज संपन्न झालेल्या महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यात अय्युब भाई पठाण यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. मागील आठ वर्षापासून हे पद बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या कडे होते. दरम्यानच्या काळात अय्युब भाई पठाण यांनी नगर परिषद उपनगराध्यक्ष पदी तसेच पाणी पुरवठा सभापती म्हणून देखील उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. या नियुक्तीच्या वेळी तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, मावळते अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, युवक आघाडीचे शहराध्यक्ष एजाज शेख, प्रा. विनोद जगतकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

---

# मौज येथे खंडोबा यात्रेनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन - किरण डावकर

बीड ।प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे मौज येथे पुरातन कालीन हेमाडपंथी जागृत खंडोबा देवस्थान यात्रा दिनांक २५ ते २७ नोव्हेंबर यादरम्यान भरते. या मंदिराची ख्याती जेजुरीच्या पाठोपाठ प्रसिद्ध आहे.या यात्रेनिमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन दि. २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी सकाळी ९.३० वा. करण्यात आले आहे. सध्या बीड जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटल मधील रक्तपेढीत रक्ताचा तूटवडा जाणवत आहे. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून युवकांनी व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने रक्तदान शिबिरासाठी उपस्थीत राहून रक्तदान करावे असे आवाहन मौज येथील



सर्व ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते व आयोजक किरण डावकर यांनी केले आहे. तसेच या यात्रेस सर्व भाविक भक्तांनी महोत्सवात सहभाग घेऊन खंडोबा महाराज देवस्थानच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन खंडोबा महाराज देवस्थान मंदिर संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेचा १२ डिसेंबर रोजी नागपूर येथे आक्रोश मोर्चा

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा परिषदेच्या लिपिक स्वर्गीय कर्मचारी संघटनेच्या नागपूर मोर्चा येथे मोर्चा आयोजित केला आहे. या मोर्चासाठी बीड येथील सर्व पदाधिकारी, सदस्य हे मोर्चासाठी रवाना होणार आहेत. दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी जे स्थानिक मुख्यालयातील कार्यालयातील कर्मचारी लिपीक संवर्गीयं बंधू व भगिनी बांधव जाणार आहेत. मोर्चात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा कार्याध्यक्ष सोनवळकर एम.बी. मो. ९४२३४६९६, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर आगळे, जिल्हासचिव, कैलास तांगडे, जिल्हा उपाध्यक्ष, ज्ञानेश्वर कुलकर्णी, यांचेशी तर महिला कर्मचाऱ्यांनी श्रीमती गोसावी पुरी, पंचायत समिती बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जय महाराष्ट्र लिपिक वर्गीय संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.सदर मोर्चा महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक संघटनाचे महामंडळ पुणे बीड जिल्हा कार्यकारिणीने आक्रोश मोर्चासाठी जाहीर पाठिंबा दिला आहे.

---

# डॉ. पूर्विता वाकचौरे च्या टिमची जागतिक पातळीवर दखल

## ऑस्कर बुक रेकॉर्ड मध्ये नोंदविले जागतिक रेकॉर्ड

अकोले (प्रतिनिधी)

कळस गावची सुकन्या डॉ. पूर्विता वाकचौरे हिच्या नेतृत्वाखालील टीम ने कमी वेळात सर्वाधिक दंत तपासणी चे जागतिक रेकॉर्ड केले असून याची दखल ऑस्कर बुक रेकॉर्ड ने घेतली आहे. कर्नाटक राज्यातील बंगलोर येथे आयोजित या जागतिक रेकॉर्ड साठी ७ तासात ५०,००० दंत तपासणी चे उद्दिष्ट असताना या टीमने ५६,६०० व्यक्तींची दंत तपासणी केली. या मध्ये ९० ठिकाणी कॅम्प आयोजित केले होते त्यामध्ये १०० दंत डॉक्टर यांनी सहभाग घेतला होता. या सर्व टीमचे नेतृत्व डॉ. पूर्विता वाकचौरे हिने केले. डॉ. पूर्विता वाकचौरे हिला कामगिरी बद्दल ऑस्कर बुक रेकॉर्ड ने शानदार समारंभात सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

डॉ.पूर्विता वाकचौरे हि जिल्हा परिषद चे अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे यांची कन्या आहे. तिचे वैद्यकीय शिक्षण डी वाय पाटील मेडिकल कॉलेज पुणे इथे झाले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.

---

# कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, मोहखेड यांच्या वतीने पात्रुड येथे महाआरोग्य शिबिर संपन्न - शेकडो नागरिकांनी घेतला लाभ

एक हजार रुग्णांची केली तपासणी

माजलगाव ।प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य केंद्र, पात्रुड (ता. माजलगाव, जि. बीड) येथे दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सर्वसमावेशक महाआरोग्य शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले. कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, मोहखेड यांच्या वतीने आणि मा. जयसिंग भैय्या सोळंके यांच्या कुशल व दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. संस्थेच्या अध्यक्षा सौ. ऐश्वर्याताई जयसिंग सोळंके यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे हा उपक्रम अत्यंत नियोजनबद्धपणे पार पडला.

शिबिरादरम्यान नागरिकांसाठी तपासण्या पूर्णतः मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या त्या मध्ये मुखतः हिमोग्लोबीन, साखर (शुगर), बी.पी., ईसीजी, सीबीसी, हृदयगती तपासणी, ऑक्सिजन टक्केवारी तपासणी, किडनी, लिव्हर, थायरॉईड तपासणी, शरीरातील चरबी मापन, नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, लहान मुलांची आरोग्य तपासणी मनक्याचे विकार - गॅप, सरकणे, मुंग्या येणे, कमजोरी, दिव्यांग रुग्ण तपासणी व प्रमाणपत्र वितरण परिसरातील माता-भगिनी, ज्येष्ठ नागरिक, तरुण व बालरुग्णांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुविधांचा लाभ घेतला.

शिबिरात विविध शाखांतील अनुभवी डॉक्टरांनी आपली सेवा निशुल्क उपलब्ध करून दिली : डॉ. हनुमंत वेताळ - मधुमेह तज्ञ, डॉ. ज्ञानेश्वर गिलबीले - मधुमेह व हृदयरोग तज्ञ, डॉ. सुनिल बोबडे व डॉ. राधाकिसन डाके - हृदयरोग तज्ञ, डॉ. गणेश सुरवसे, डॉ. तेजस निनावे, डॉ. बालाजी नवले - अस्थिरोग तज्ञ, डॉ. किरण जाधव - त्वचा व गुप्तरोग तज्ञ, डॉ. लक्ष्मीकांत यादव - कान, नाक, घसा तज्ञ, डॉ. गणेश बाबरे - पोटाचे विकार तज्ञ

डॉ. मुजीब सौदागर - नेत्रचिकित्सक डॉ. आत्माराम मुंडे - स्त्रीरोग तज्ञ, डॉ. बालाजी घुले - दंतरोग तज्ञ, डॉ. माणिक सांगळे - बालरोग तज्ञ, डॉ. रहिम शेख - जनरल फिजीशियन, त्यांच्या मार्गदर्शनामुळे शेकडो रुग्णांना अचूक निदान व आवश्यक उपचार मिळाले. या आरोग्य उपक्रमाला गावातील तसेच परिसरातील



नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. तज्ज्ञ डॉक्टरांची तपासणी, औषधोपचार, मार्गदर्शन, सरकारी योजनांची माहिती, नोंदणी इत्यादी सुविधा एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने सर्वत्र समाधान व्यक्त केले जात आहे. आरोग्य विभागातील अधिकारी, स्वयंसेवक, संस्थेचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिकांचे सहकार्य उल्लेखनीय ठरले. सामाजिक बांधिलकी व जनसेवेच्या भावनेतून राबवलेला हा कार्यक्रम 'रुग्णसेवा हिच ईश्वर सेवा' या मूल्यांची उत्तम परंपरा जपत असल्याचे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले. कानिफनाथ बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या पुढाकाराने आयोजित हे महाआरोग्य शिबिर यशस्वीपणे पार पडले. समाजातील सर्व घटकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आदर्शवत ठरला असून शिबिराबद्दल सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

---

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश निर्गमित करूनही वैद्यकीय प्रतिपूर्तीचे आदेश निघेनात

# विलंब करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी - संतोष दाणी

आष्टी ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या गट अ ते गट ड संवर्गातील अधिकारी व कर्मचारी आपल्या कुटुंबातील व्यक्तीवर शासनमान्य गंभीर व इतर आजारावर उपचार घेऊन वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाची संचिका आजारावरील खर्च मिळण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालयाकडून पडताळणी करून शिक्षण विभागामार्फत वित्त विभागाकडे मंजुरीसाठी पाठवतात. ही देयके जिल्हा शल्य चिकित्सक व वित्त विभागाकडून पडताळणी होऊन आल्यानंतर जिल्हा परिषदेतील छाननी समिती च्या



बैठकीमध्ये ती देयके याआधी मंजूर होत होती, परंतु बीड जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी यासंदर्भात दिनांक ६ नोव्हेंबर २०२५ रोजी क्र. सा. प्र. वी. / अस्था - ९ / वै. प्र. पु. / कावी / ०४३७० या आदेशान्वये या समितीची बैठक घेण्यास व वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक प्रस्ताव मंजुरीस विलंब होऊन संबंधित कर्मचाऱ्यास ही देयके मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदरील समिती रद्द करून जिल्हा परिषदेतील गट - अ व गट ड या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना दिलासा देऊन देयक लवकरात लवकर अदा करण्याचे आदेश देण्यात यावे.

यासाठी संबंधित विभाग प्रमुख यांनी आपले अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके रीतसर जिल्हा शल्य चिकित्सक, वित्त विभाग व सामान्य प्रशासन या विभागामार्फत संचिका सादर करून स्वाक्षरी घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत असे आदेश काढले आहेत, परंतु यापूर्वी काही कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देयक संचिका संबंधित विभागाकडून मान्य करून घेतलेल्या असतानाही कार्यालयातील कर्मचारी या देयकाचे आदेश काढत नसल्याचे निदर्शनास येत आहे. कर्मचारी नातेवाईकांच्या आजाराने व खर्चाने आधीच त्रस्त झालेला असतानाही गंभीर आजाराच्या देयकाचे आदेश सुद्धा संबंधित कर्मचारी काढत नाहीत. तेव्हा माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशांचे पालन न करणाऱ्या व वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकास विलंब करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करून मंजूर वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाचे आदेश तात्काळ द्यावेत

# लोक विकास महाआघाडीच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची रेकॉर्ड ब्रेक सभा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), समाजवादी पार्टी, रिपाइं आठवले गट, मनसे तसेच विविध मित्र पक्ष आणि संघटना पुरस्कृत लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवारांच्या प्रचारार्थ सोमवार, दि.२४ नोव्हेंबर रोजी राज्याचे अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा रेकॉर्ड ब्रेक झाली. सभेसाठी सर्वधर्मीय जनसमुदायाची प्रचंड संख्येने उपस्थिती होती. अत्यंत सुंदर व दिमाखदार नियोजनामुळे हि सभा लोक विकास महाआघाडीच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारी ठरली आहे.**

यावेळी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्याचे अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार तर सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ हे होते, तसेच व्यासपीठावर लोक विकास महाआघाडीच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी तसेच शहरातील १५ प्रभागातील ३१ उमेदवार यांच्यासह रमेशराव आडसकर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, राजेसाहेब देशमुख, डॉ.नरेंद्र काळे, बबनराव लोमटे, दत्तात्रय पाटील, कल्याण आखाडे, तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, रिपाइंचे महेंद्र निकाळजे, समाजवादी पार्टीचे ॲड.शिवाजी कांबळे, मनसेचे सुनील जगताप, तालुकाध्यक्ष अमरराव देशमुख, शेख मुख्तार, दिनकर जोशी, डॉ.राजेश इंगोले, लोक विकास महाआघाडीचे अध्यक्ष ॲड.अनिल लोमटे, विशाल जाजू, राजपाल लोमटे, ॲड.विष्णुपंत सोळंके, गोविंद देशमुख, ॲड.दयानंद लोंढाळ, सुनील वाघाळकर, सतिशराव लोमटे, संजिवनीताई देशमुख, अमृताताई काळदाते, बालासाहेब शेप, अशोक पालके, रशीदभाई, अंकुश ढोबळे, राजवर्धन दौंड, प्रवीण जायभाय तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार इस्माईल हिरू गवळी, मनोज लखेरा, दिनेश भराडीया, जयश्री पृथ्वीराज साठे, राजश्री अशोक मोदी, संगीता दिलीप काळे, संकेत मोदी, श्रुती अमोल लोमटे, शेख रिजवाना अहेमद, शहेबाज म.फारूख मनियार, लक्ष्मीबाई महादेवराव हेडे, महेश कदम, शेख शिरीन आशफाक, महेश बालासाहेब लोमटे, मालू भगवान जोगदंड, संगीता दाजीसाहेब लोमटे, आकाश जीवनराव कराड, क्रांती श्रेयस गोस्वामी, हिराबाई रमण सोनवळकर, दीपा दाजीसाहेब लोमटे, सय्यद ताहेर अब्दुल गफार, सोनी दत्तात्रय सरवदे, शेख शमीम शेख रहीम, सय्यद बशीरा शफीक, राजपाल संभाजी जावळे, नाजनीन बेगम अकबरखां पठाण, ज्योती विशाल पोटभरे, नजीर उमरदराजखान पठाण, रेखा विलास जाधव, विकास रामकृष्ण काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, डॉ.नरेन्द्र काळे, बबनराव लोमटे, डॉ.राजेश इंगोले, अमृता काळदाते, शहेबाज म.फारूख मनियार, सुनिल जगताप, राजेंद्र मोरे, ॲड.दयानंद लोंढाळ, मुजम्मील सर यांची समायोचित भाषणे झाली. यावेळी बोलताना

## अंबाजोगाईच्या सर्वांगीण विकासाचा शब्द मी देतो, तुम्ही लोक विकास महाआघाडीच्या राजकिशोर मोदींसह सर्वच उमेदवारांना विजयी करा - उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे आवाहन



राज्याचे अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी सांगितले की, मी कामाचा माणूस आहे आणि शब्दाचा पक्का आहे. महाराष्ट्राच्या जनतेने माझ्यावर ३५ वर्षांपासून विश्वास टाकला आहे, मी कधीही जाती-पातीचे राजकारण केले नाही. आम्ही कायमच संविधानाचा आदर करून सामाजिक सलोखा जपला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या संविधानाचा वेळोवेळी गौरव केला आणि या मूल्यांचे आम्ही कधीच विस्मरण होवू देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. अंबाजोगाई शहराचा उल्लेख करताना ते म्हणाले की, १९६२ साली यशवंतराव चव्हाण साहेबांनी अंबाजोगाई हे नांव दिले आणि या शहराने कायमच सामाजिक सलोखा जपला आहे असे सांगितले. सभेचा अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ यांनी सांगितले की, राजकिशोर मोदी हे मायक्रो मायनॉरिटी समाजातील आहेत.

### राजकिशोर मोदी यांच्यासह लोक विकास महाआघाडीला विजयी करण्याचे आवाहन :

निवडणुकीचा उल्लेख करीत पवार यांनी मतदारांना आवाहन केले की, तब्बल ४ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ही निवडणूक होत आहे. ६५ हजार मतदार असलेल्या या शहरात आमचे राजकिशोर मोदी हे सर्वांना हवे-हवेसे वाटणारे उमेदवार आहेत. मोदींनी आतापर्यंत सर्व समाज घटकांना न्याय दिला आहे. मोदींकडे राजकीय इच्छाशक्ती आहे. पापा मोदी हे विश्वासाचे नांव आहे, अंबाजोगाईत शांतता, एकोपा, सामाजिक सौहार्द व विकास प्रक्रिया कायम ठेवण्यासाठी विरोधकांच्या कोणत्या ही भुलथापा, प्रलोभन यांना बळी न पडता पापा मोदी व लोक विकास महाआघाडीच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभे रहावे, माझी संपूर्ण ताकद मोदींच्या सोबत आहे. यापुढील काळात केंद्र व राज्य सरकारच्या वतीने व पापा मोदींच्या माध्यमातून अंबाजोगाईला भरीव निधी देवूत, आपल्या विश्वासाला मी तडा जावू देणार नाही. बारामती, पिंपरी चिंचवडच्या धर्तीवर अंबाजोगाईचा सर्वांगिण विकास करू, म्हणून राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली लोकविकास महाआघाडीच्या ३२ उमेदवार, ३१ नगरसेवक आणि १ नगराध्यक्ष सर्व उमेदवाराना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी केले.



## जागतीक दिव्यांग दिना दिवशी दिव्यांग व्यक्तीच्या मागण्यासाठी आंदोलन करणार - जिलानी शेख अशोक दगडखैर

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीच्या प्रश्नाकडे शासनास्तरातुन तहसीलदार, गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी हे दुर्लक्ष करत असले बाबत दि.०३ डिसेंब २०२५ रोजी दिव्यांग दिना निमित्त तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्यात येणार आहे असे दिव्यांग संघर्ष समिती चे जीलनी शेख व अशोक दगडखेर यांनी म्हटले आहे

मागण्या खालील प्रमाणे

दिव्यांग व्यक्तीचे संजय गांधी योजनेचे मानधन उर्वरीत १००० रुपये हाप्ता त्वरीत वर्ग करण्यात यावा तसेच पाटोदा तालुक्यातील बऱ्याच दिव्यांग व्यक्ताना २५०० रुपये ऐवजी १५०० रुपये आले आहेत तरी सदरील दिव्यांग व्यक्तीचे कागदपत्र तात्काळ घेऊन त्यांना उर्वरीत रक्कम त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी,पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्ताना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा नगरपंचात अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा करीता कसल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही तरी दिव्यांग कायदा २०१६ अंतर्गत संबधीत गटविकास यांना दिव्यांग कल्याण विभाग जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय बीड यांनी आदेश देऊन ही कार्यवाही केली नाही , पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा व ज्या दिव्यांग व्यक्तीचे घरकुल योजनेत नाव आलेले आहे त्यांना तात्काळ प्रथम प्राधान्याने घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा,अंत्यादोय राशन कार्ड योजने अंतर्गत शासनाच्या पारपत्राकानुसार दिव्यांग व्यक्तीना तात्काळ जाचक अट न देता या योजनेचा लाभ देण्यात यावा ,पाटोदा तहसील अंतर्गत संजय गांधी विभाग कायमस्वरुपी तळमजल्यावर घेण्यात यावा.

वरील सर्व प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी नसता जागतीक दिव्यांग दिनी दि.०३ डिसेंबर २०२५ वार बुधवार या दिवशी तहसील कार्यालया समोर योग्य प्रकारचे आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे निवेदनात जीलानी शेख , अशोक दगडखैर , वैभव देशमुख , दत्ता कदम , बजरंग लांडगे , बापु पावसे ' हनुमंत काळूशे ' बांगर , संतोष गुंजाळ , शेरे कांकरीया , कैलास मकाळ यांनी म्हटले आहे

# चक्काजाम आंदोलनाने प्रशासन व साखर सम्राटांना फोडला घाम

जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत आज बैठक ; तूर्तास आंदोलन स्थगित

बीड ।प्रतिनिधी

ऊसदराच्या प्रश्नावर सर्वच शेतकरी संघटना एकत्र येत माजलगाव येथील चक्काजाम आंदोलन आक्रमकपणे सुरू केले, प्रशासनाने अनेकवेळा मध्यस्थी केली मात्र आंदोलक माघार घेण्यास तयार नसल्याने शेवटी जिल्हाधिकारी यांनी मध्यस्थी करत आज जिल्ह्यातील सर्व साखर कारखानदार व विविध शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांची बैठक आयोजित केल्याने हे आंदोलन तुर्तास स्थगित केले असून आजच्या बैठकीत मागण्या मान्य न झाल्यास कोयता बंद, ऊस वाहतूक बंद आणि वेळेप्रसंगी गव्हाणीत उतरण्याची तयारी ऊस उत्पादक शेतकरी बांधवांनी केली आहे.

ऊस दर बाबत जिल्हयातील सर्वच शेतकरी संघटना एकवटल्या असून सोमवार दि २४ रोजी माजलगाव येथील वसंतराव नाईक चौक परभणी नाका या ठिकाणी सकाळी पासून हजारो ऊस उत्पादक शेतकरी ठाण मांडून बसले होते. प्रशासनाने अनेकवेळा मध्यस्थी केली मात्र ठोस निर्णय दिल्या शिवाय मागार नाहीच या भूमिकेतून शेतकरी संपूर्ण तयारीनिशी आंदोलनात सहभागी झाल्याने प्रशासनाच्या प्रतिनिधीना मागारी फिरावे लागले. दरम्यान सायंकाळी माजलगावचे उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याशी या आंदोलनाची तीव्रता आणि शेतकऱ्यांची मानसिकता कथन केल्यावर बीडच्या जिल्हाधिकारी यांनी आज मंगळवार दि २५ रोजी जिल्हयातील सर्व साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांची विस्तारित बैठक प्रगती हॉल बीड येथे आयोजित करून शेतकऱ्यांच्या मागण्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे अभिवचन दिल्याने सर्वानुमते चक्काजाम आंदोलन हे तुर्तास स्थगित करण्यात आले आहे.या आंदोलनात आंदोलनामध्ये सहभागी झालेले किसान सभेचे राज्य अध्यक्ष कॉ. उमेश देशमुख, कालिदास आपेठ अजय राऊत, ,तुकाराम नावडकर, ,भाई नारायण गोले, कॉ.मोहन जाधव, दिनकर चाळक, नामदेव सोजे, अजय बुरांडे, जगदीश फरताळे कॉ.दीपक लीपने,विजय दराडे, काँ कृष्णा सोळंके आदी सह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व युवा शेतकरी उपस्थित होते.



### सकारात्मक निर्णय न झाल्यास गव्हाणीत उतरू

ऊस दर बाबत करण्यात आलेल्या या आंदोलनात सहभागी असलेल्या किसान सभेचे नेते एड.अजय बुरांडे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की, कायदा आणि सुव्यवस्था याचे पालन करत हे आंदोलन सुरू असून मा. जिल्हाधिकारी यांच्या विन्नती वरून हे आंदोलन तुर्तास आज स्थगित करण्यात आले आहे. साखर कारखानदार आणि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी यांच्या बैठकीत मागण्या मान्य न झाल्यास वेळेप्रसंगी ऊस उत्पादक शेतकरी साखर कारखाने बंद करतील आणि गव्हाणीत उतरण्यास देखील मागे-पुढे पाहणार नाहीत याची दखल प्रशासन आणि साखर कारखानदारांनी घ्यावी.

**शेतकऱ्यांचे रस्त्यावरच जेवण**

रक्ताचं पाणी करून कर्ज काढून पिकवलेल्या ऊस दर बाबत आपल्या हक्काच्या मागण्या घेत जिल्ह्यातील हजारो ऊस उत्पादक शेतकरी स्वतःच्या खर्चाने आंदोलन स्थळी सहभागी झाले होते. घरून बांधून आणलेली चटणी-भाकरी रस्त्यावर सोडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी दुपारचे जेवण केले. अनेक ऊस उत्पादक शेतकरी महिला देखील यावेळी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

## शिरूर (का) तालुक्यातील रस्त्याच्या विकास कामांसाठी १० कोटींचा निधी मंजूर


### आ.सुरेश धस यांनी मानले ना.गडकरींचे आभार

आष्टी ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील अत्यंत महत्त्वाच्या आणि नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीसाठी जीवनवाहिनी ठरणाऱ्या तरडगव्हाण - श्रृंगारवाडी - तिंतरवणी - निमगाव मायंबा या रस्त्याच्या विकास कामांसाठी केंद्रीय मार्ग निधी योजनेतून रु. १० कोटींचा मोठा निधी केंद्रीय



रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांचे कडून मंजूर करण्यात आला. यावेळी आ. सुरेश धस यांनी गडकरींचे आभार मानले. हा निधी मिळवण्यासाठी आमदार मा. सुरेश धस यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे फलित म्हणून या योजनास मंजुरी मिळाली असून, या निर्णयाबद्दल केंद्रीय रस्ते विकास मंत्री मा. नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत आ. धस यांनी या रस्त्याच्या विकासामुळे परिसरातील वाहतुकीची सुसूत्रता आणि सुरक्षितता मोठ्या प्रमाणावर वाढणार, संपर्कसुविधा अधिक प्रभावी होणार तसेच संपूर्ण भागाच्या सामाजिक - आर्थिक विकासाला नवी गती मिळणार असल्याचे सांगत या निर्णयामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळेल आणि तालुक्याच्या प्रगतीचा मार्ग अधिक गतीने मोकळा होईल, असा विश्वास देखील आ. धस यांनी व्यक्त केला आहे.



**केज ।प्रतिनिधी**

**साने गुरुजी निवासी प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केज येथे नशामुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यां साठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात अँड. उद्धवराव कराड यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा,मद्यपान यांसह सर्व प्रकारच्या व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत मार्गदर्शन करत नशामुक्त राहण्याचे आवाहन केले.अँड.उद्धवराव कराड यांनी आपल्या भाषणात सांगितले की,तरुण पिढी ही देशाची संपत्ती आहे. व्यसनामुळे आरोग्य, शिक्षण,कुटुंब आणि भवितव्य सर्वांवर दुष्परिणाम होतात. त्यामुळे तरुणांनी कोणत्याही प्रकारच्या नशेपासून दूर राहणे आवश्यक आहे.कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाला उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत नशामुक्त समाज निर्मितीसाठी हातभार लावण्याची प्रतिज्ञा केली.**

## मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या सचिव सौ.मनीषाताई टोपे यांची पिंपरखेड बू.येथे शाळेला भेट

जालना /प्रतिनिधी

पिंपरखेड बू. मत्स्योदरी विद्यालय पिंपरखेड बू येथे मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. मनीषाताई टोपे यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी व पालकांशी थेट संवाद साधला. शैक्षणिक गुणवत्ता,विद्यार्थी सुरक्षा आणि शाळेच्या प्रगतीसंदर्भात त्यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.भेटीदरम्यान लोकसहभागातून सुरू असलेल्या दोन वर्गखोल्यांच्या बांधकामाची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले. गावकऱ्यांनी दाखवलेल्या एकजुटीचे आणि माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या सहकार्याचे विशेष कौतुक करत गावाच्या सहभागातून उभी राहणारी शाळा हीच खऱ्या अर्थाने प्रगतिशील शिक्षणाची पायरी असते असे मत व्यक्त केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री.के.एन.गवळी यांनी शालेय व सहशालेय उपक्रमांची,विद्यार्थ्यांच्या प्रगतीची आणि शाळेतील सुविधांची सविस्तर माहिती मनीषाताईंना दिली.शिक्षण व्यवस्थापन,विद्यार्थ्यांची शिस्त, आधुनिक अध्यापन



पद्धती आणि सुरक्षा या महत्वपूर्ण क्षेत्रांवर त्यांनी शिक्षकांना दिशा दिली.या भेटीस प.स.चे माजी सभापती श्री.भागवतराव रत्काटे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीपादजी कंडारकर, परमेश्वरजी केदार,अशोकराव भगत,डॉ.तिकांडे,श्री. दादारावजी मुळे,शाळेचा सर्व स्टाफ व मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.गावकऱ्यांच्या सहभागामुळे शाळेच्या विकासाला नवे बळ मिळत असल्याचा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

## बिरदेव ईरबा कुणे यांचे निधन

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील धनगर समाजातील शेतकरी



बिरदेव ईरबा कुणे ( वय ३८ )यांचे दु:खद निधन झाले.दि.२४ सोमवारी ४ वाजता सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पाश्चात्य आई, पत्नी एक मुलगी एक मुलगा असा मोठा परिवार आहे ते मुक्रमाबाद येथील शेतकरी नरशींग कुणे यांचे पुतण्या होत.



## दावरवाडी येथील पायी दिंडी सोहळा व संत पुजन....!

दावरवाडी, प्रतिनिधी / सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रीसंत गजानन महाराज यांचे पट्टशिष्य श्रीसंत भास्कर महाराज प्रासादिक पायी दिंडी सोहळा श्रींची जन्मभूमी श्रीक्षेत्र अकोली जहांगीर ता.अकोट ते श्रीक्षेत्र आळंदी देवाची या दिंडी सोहळ्याचे परतीच्या प्रवासात आज (ता.२३) रोजी मौजे दावरवाडी येथील ह.भ.प.बाबुराव महाराज सातपुते (चोपदार) श्रीराम मंदिर संस्थान यांच्या निवासस्थानी आगमन झाले. यावेळी दिंडी चालक ह.भ.प. मोहन महाराज रेळे व दिंडीतील वारकऱ्यांचे संतपुजन करून महाप्रसाद करण्यात आला. यावेळी बाबुराव सातपुते, भाऊसाहेब सातपुते, संभाजी तांगडे, रविंद्र सातपुते, किरण सातपुते, चैतन्य सातपुते, श्रेयश सातपुते, राम सातपुते व गावातील भक्त मंडळी यावेळी उपस्थित होते.

# कंधार लोह्याच्या विकासासाठी राष्ट्रवादीला विजयी करा - उपमुख्यमंत्री अजित पवार

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांसाठी कंधार मध्ये प्रचारसभा

कंधार ।प्रतिनिधी

राज्य प्रगतीकडे नेण्याचा आमचा मानस आहे. कुणाच्या भूलथापांना बळी पडू नका. कंधार व लोहा शहरात राष्ट्रवादीने नव्या जुन्याचा योग्य समन्वय साधून उमेदवार दिले आहेत. पाच वर्षासाठी दोन्ही शहरांची सूत्र कुणाच्या हातात द्यावी, याचा सदविवेक बुध्दीने विचार करण्याची वेळ आली आहे. कंधार व लोहा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादीच्या हातात सत्ता द्या असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.कंधार व लोहा शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कंधार येथील छत्रपती शिवाजी चौकात आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. आमदार



प्रताप पाटील चिखलीकर, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी आ. अविनाश घाटे, माजी आ. सुभाष साबणे, माजी आ. मोहन हंबर्डे, ड. मुक्तेश्वर धोंडगे, प्रवीण पाटील चिखलीकर, कंधार नगराध्यक्षपदा चे उमेदवार स्वप्निल पाटील लुंगार, लोहा नगराध्यक्षपदाचे उमेदवार शरद पवार, माजी नगराध्यक्ष अनुराधा केंद्रे, प्रा. चित्रताई लुंगारे, उमेदवार मन्नान चौधरी, म. जफरोद्दिन, बाबुराव केंद्रे, किशन डफडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार चिखलीकर यांनी प्रस्ताविक केले. कंधार शहराच्या वैभवात भर कशी करायची यासाठी संधी चालून आलेली आहे. कंधारच्या जनतेला विकास पाहिजे. ज्यांची केंद्रात व राज्यात सत्ता नाही. अशी लोक शहराचा विकास करण्याच्या गप्पा मारत आहेत. नगरपालिका राष्ट्रवादीच्या ताब्यात द्या. अजित पवारांच्या माध्यमातून कंधारचा चेहरा मोहरा बदलल्या शिवाय राहणार नाही. मी कुठल्याही पक्षात असलो तरी जातीयवाद केला नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मोठ्यासांख्येने मतदार उपस्थित होते.

# सहयोगच्या फार्मसी कॉलेज मध्ये इंडक्शन कार्यक्रम व पालक भेट संपन्न

**नांदेड ।प्रतिनिधी**

**सहयोग सेवाभावी संस्थेच्या इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी आणि कॉलेज ऑफ फार्मसी, विष्णुपुरी, नांदेड येथे दिनांक २२ नोव्हेंबर २०२५ रोजी नव्याने प्रवेश घेतलेल्या बी. फार्मसी, एम. फार्मसी, फार्म.डी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रम व पालक भेट आयोजित करण्यात आली. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.**

कार्यक्रमाचे उद्घाटन दीपक कोठारी, सदस्य, महाराष्ट्र राज्य फार्मसी परिषद (चड्झउ), नरेश डोके, मुख्य औषधनिर्माण अधिकारी, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड, राजेश्वर रेड्डी, समन्वयक, महाराष्ट्र राज्य फार्मसी परिषद, . शेख सिकंदर, अधीक्षक, परीक्षा विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. संतुकरावजी हंबर्डे उपस्थित होते.

अतिथींच्या मार्गदर्शनात फार्मसी शिक्षणाचे महत्त्व, व्यवसाय संधी, संशोधन व उद्योग क्षेत्रातील वाढत्या मागण्या तसेच शासकीय नोकरीच्या संधींचा आढावा विद्यार्थ्यांना देण्यात आला. शासकीय सेवेत संधी सांगताना डोके सरांनी, तर फार्मसी उद्योगक्षेत्र आणि व्यवसाय संधींवर कोठारी सरांनी विशेष प्रकाश टाकला. रेड्डी सरांनी खाजगी क्षेत्रातील विस्तृत करिअर पर्यायांची माहिती दिली तर शेख सिकंदर सरांनी विद्यापीठ परीक्षा पद्धती व शैक्षणिक संरचनेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. संतुकरावजी हंबर्डे यांनी सहयोग कॅम्पसची ओळख करून देत उभारणी, शैक्षणिक प्रगती, संस्थेचा सामाजिक आणि शैक्षणिक प्रवास तसेच भविष्यातील योजना याबद्दल सविस्तर माहिती दिली.

इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. विजय नवघरे यांनी संस्थेची माहिती, सुविधा, कॅम्पस संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती सादर केली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. कांबळे व श्रीमती गजाले यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ जाधव जमीरुद्दीन आणि . सगरुले यांनी काम पहिले. प्राध्यपिका भगत यांनी बी फार्म व फार्म डी अभ्यासक्रमा विषयी माहिती दिली व प्राध्यपक सागरुळे यांनी डी फार्मची च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या शेवटी संवाद सत्र घेण्यात आले. पालक व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत सहयोग कॅम्पसमध्ये शैक्षणिक प्रवास सुरू करण्याचा आनंद व्यक्त केला.

# मनपाची सिडको परिसरात , रस्त्यावर विक्री करणाऱ्या विरूद्ध कार्यवाही

नवीन नांदेड ।प्रतिनिधी

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या वतीने सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या प्रभाग क्रमांक २० मधील सिडको परिसरातील मुख्य बाजारपेठ मध्ये असलेल्या मुख्य रस्त्यावरील फळे ,भाजीपाला,फुल विक्रेते यांच्या सह विविध प्रतिष्ठानचा वतीने दुकानाबाहेर ठेवण्यात येणारा विक्रीसाठी असलेल्या वस्तू यांच्या वर मनपा अतिक्रमण पथकाने गुरूवार व सोमवार दोन दिवस केलेल्या कार्यवाहीने रस्ता मोकळा झाला असून प्रशासनाने सातत्याने हि कार्यवाही कायम ठेवावी अशी मागणी होत आहे.

सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ व २० मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पासून मुख्य मार्गावर बाजारपेठ व रस्त्यावर विविध प्रतिष्ठानचा वतीने व फळ गाडे, भाजीपाला विक्रेते यांच्या सह अनेकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने जाणारी येणारी वाहतूक दैनंदिन खोळंबत असल्याने व आठवडी बाजार दिवशी मोठ्या प्रमाणात वाहतूक खोळंबली असल्याने या बाबत अनेकांनी व परिसरातील आजी माजी नगरसेवक यांनी तक्रारी केल्या होत्या, तक्रारी दखल घेऊन मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अजितपाल सिंग संधू, सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग प्रमुख विशाल सोनकांबळे यांच्या आदेशानुसार अधिनस्त कर्मचारी यांनी सिडको परिसरात गुरूवार व सोमवार या दोन दिवशी मुख्य बाजारपेठ मार्गावर रस्त्यावर विक्री साठी बसलेले फुल,फळ,हातगाडे यांच्या सह विविध प्रतिष्ठान यांनी केलेले अतिक्रमण काढले असून विक्रीसाठी ठेवलेल्या वस्तू जप्त केल्या असून दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे,या कार्यवाही मुळे सध्या तरी रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे,ही अतिक्रमण कार्यवाही सातत्याने ठेवावी अशी मागणी होत आहे.

# तुप्पा येथील मुर्ती स्थापना वर्धापन सोहळ्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह,ज्ञानेश्वरी पारायण,व किर्तन सोहळा उत्साहात

नवीन नांदेड ।प्रतिनिधी

श्री हनुमान मंदिर,संत ज्ञानेश्वरी संजिवनी समाधी सोहळा निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह ,ज्ञानेश्वरी पारायण, व श्रीहरी कीर्तन मौजे तुप्पा ता.जि. येथे १७ ते २४ नोव्हेंबर २५ पर्यंत आयोजित करण्यात आला होता, यावेळी भागवत कथाकार हभप विश्वनाथ महाराज कांकाडीकर यांच्या काल्याचा किर्तनाने सप्ताह सांगता करण्यात आली यावेळी पंचक्रोशीतील अनेक गावांतील महिला भाविक भक्त यांच्या सह ग्रामस्थांनी महाप्रसाद लाभ घेतला.

श्री हनुमान मंदिर तुप्पा येथे मुर्ती स्थापने चा ९वा वर्धापनदिन सोहळा निमित्ताने प्रेरणास्थान वै. मामासाहेब मारतळेकर, ह.भ.प.आंनदबन गुरू गंभीरबन मंहत, शिभप सांब शिवाचार्य महाराज,वैदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज,हभप भाऊसाहेब महाराज, हभप विश्वनाथ महाराज , हभप कै. माणिक महाराज, व प्रेरणास्थान किशन महाराज बरडेकर यांच्या आशिर्वादाने श्री संत ज्ञानेश्वरी संजिवनी समाधी सोहळ्या निमित्य अखंड हरिनाम सप्ताह व श्री हरी कीर्तन मौजे तुप्पा ता. जि. नांदेड येथे दि. १७ते दि. २४ नोव्हेंबर २५ दरम्यान दैनदिन कार्यक्रम या सोहळ्यात सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ७ते १०ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा भजन, दुपारी १ ते ३ तुकाराम चरित्र, ३ ते ६भोजन, ६ ते ७ हरिपाठ आयोजित करण्यात आले असून दि. १७ नोव्हेंबर रोजी सोमवार ह. भ. प. श्री किशन महाराज बरबडेकर यांचे संजीवनी सोहळ्या निमित्य सकाळी ११ते दु. १ गुलालाचे किर्तनाने आयोजित





करण्यात आले होते, यावेळी काकांडा प्रमुख हभप शिवाजी मुंडकर, बालाजी भिमराव पाटील कदम, भास्कर कदम,तर तुकाराम चरित्र वाचक हभप आनंदराव पाटील इंगळे राहेगावकर व राम पाटील कांकाडीकर यांनी केले होते.

२४ नोव्हेंबर हभप विश्वनाथ महाराज कांकाडीकर यांच्या काल्याचे कीर्तनाने व महाप्रसादाने सांगता झाली,अखंड हरिनाम सप्ताह मध्ये गावातील अन्नदाते शिवहार पांडूरंग भालेराव, रामचंद्र महादजी पा. कदम,गणेश मारोती भालेराव,माधव विठ्ठल पा. कल्याणकर, सुदाम माणिकराव पा. कदम श्रीराम पा. कदम,विठ्ठल मारोती पाटील कदम, रोहिदास कदम,रावसाहेब महाजन कदम ,(मुकदम) , गंगाधर नरवाडे,अशोक कदम, साहेबराव कदम,पंडीत महादजी पा.कदम ,महाजन माणिकाराव कदम, प्रमोद सुरजमल नागोरी,यांनी सहकार्य केले आहे. तर सप्ताह सांगता सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख उध्दव पाटील शिंदे, बालाजी पाटील भायेगावकर, माजी पंचायत समिती सदस्य गंगाधर नरवाडे, मारोती तळणे, सरपंच सौ.मंदाकिनी यन्नावार, ऊपसरपंच प्रतिनिधी दता पाटील कदम, महाजन पाटील,विलायात कदम,देवराव टिपरसे,गुलाब कदम,श्रीराम पाटील, गजानन कदम, यांच्या सह पोलीस पाटील वसंत पल्लेवाड, व माजी पोलीस पाटील अझमोध्दीन, यांच्या सह गावातील जेष्ठ नागरिक युवक,महिला भाविक भकत मोठया संख्येने उपस्थित होते, कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावकरी मंडळी, तुप्पा ता. जि.नांदेड यांनी परिश्रम घेतले.

# नांदेड जिल्हा परिषद सदस्य पदाचे आरक्षित ३ गटावर टांगती तलवार..?

## ५०%समतोल करण्यासाठी ३३ गट आरक्षण आवश्यक

तामसा ।प्रतिनिधी

नांदेड जिल्हा परिषद आरक्षणात ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याने सोडत पुन्हा होणार ? किंव्हा राजकीय मर्यादित आरक्षण कमी करून समतोल करण्यात येईल.नांदेड जिल्हा परिषद च्या एकूण ६५ जागेवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राखीव जागांचे आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादित पाहिजे. मात्र, सर्वाधिक लोकसंख्येच्या आधारे उतरत्या क्रमात आरक्षण सोडतीमुळे जिल्ह्यात मर्यादेचे सीमोल्लंघन होऊन ३६ जागा आरक्षित झाल्याने खेळा होईग्या आरक्षित जागांचे प्रमाण ५६टक्क्यावर गेल्याने काही आरक्षित जागा बदलण्याची शक्यता असून याचा कोणाला फटका बसणार हे दिनांक २५ रोजी सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या सुनावणीनंतर समजणार आहे. चोकटराजकीय मर्यादित आरक्षण जातीनिहाय क्रमश. अनुसूचित जाती १३%, अनुसूचित जमाती ७%, नागरिकांचा मागास प्रवर्ग २७%या मर्यादित आरक्षणच्या आधारे ६५ पैकी ३३ गट आरक्षण ५०% पण सदपारिस्थितीत आरक्षण सोडतीत नागरिकांचा मागास प्रवर्ग वर गदा बसल्याने समजते. अनुसूचित जाती च्या १३ टक्के चा आरक्षण च्या आधारे ८ गट आरक्षण गणित बनते पण या सोडतीत १३ गट सुटल्यानं तसेच अनुसूचित जमाती (एस टी) ७टक्के चा आरक्षण च्या आधारे ५ गट आरक्षित होते पण या समीकरणात लोकसंख्या




च्या आधारे झालेल्या आरक्षण सोडतीत हा राजकीय गणित अभ्यासपूर्ण न केल्यानं ओबीसी वर गदा बसल्याने कळते या नागरिकांचा मागास प्रवर्ग ला राजकीय आरक्षण श्रेणीत २७टक्के दिलेलं आहे पण या सोडतीत १८ गट अपेक्षित असताना १७ गट सोडतीत मिळालं या १ गट कमी मिळाल्याने हा राजकीय समीकरण सर्वोच्च न्यायालय पर्यंत गेला...

राजकीय पुढाऱ्यांचे भवितव्य

स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीत ५० टक्के मर्यादित आरक्षण असावे, याबाबत न्यायालयाने शासनाला निर्देशित केले आहे. जिल्ह्यात गटांची आरक्षण स्थिती पाहता टक्का ५० वरून ५६ वर पोहोचला आहे.. अशात मागील महिन्यात जिल्हा परिषद निवडणुकांसाठी आरक्षण सोडत झाली. त्यानंतर तळागळातील कार्यकर्ते मोठ्या जोमाने निवडणुकीच्या तयारीला लागले होते. मात्र, जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे निदर्शनास आले. यामध्ये नांदेडचाही समावेश असल्याने निवडणूका आणखी लांबणार काय? असा प्रश्न पडला आहे.नांदेड जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या ६५ जि. प. गटांपैकी ३६ गट आरक्षित झालेत. यामध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) १७, अनुसूचित जाती (एससी) १३, अनुसूचित जमाती (एसटी) ६ जागांचा समावेश असून २९ जागा ह्या सर्वसाधारण प्रवर्गासाठी (ओपन) आरक्षित झाल्या होत्या. मात्र, यात ५० टक्केची आरक्षण मर्यादा ओलांडल्याने पुन्हा आरक्षित गट बदलणार अशी चर्चा होत आहे.राजकीय आरक्षणात तंतोतंत मर्यादितेत समतोल करून कोणत्या दोन अथवा तीन आरक्षित गटावर गदा बसेल या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.. समीकरणात नांदेड जिल्यातील अनुसूचित जाती च्या ५गट व अनुसूचित जमाती च्या एक गट जास्त आरक्षित झाल्याने हदगांव हिमायतनगर तालुक्यातील सरसम व तामसा अनुसूचित जमाती ला आरक्षण सुटल्याने या दोन गटापैकी एक गटाचे आरक्षण रद्द होऊन या जागेवर ओबीसी अथवा सर्वसामान्य ला जाऊ शकते तसेच तामसा गट अनुसूचित जमाती लोकसंख्या आधारे पूर्ववतं आरक्षण जेसेथे राहू शकते यात शंका नाही..सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे निवडणूक विभागाकडून

# नियोजित टोल नाक्यावर अपघातात एकाचा बळी.. आरोपी ला आद्याप अटक नाही..

## रुद्राणी कन्स्ट्रक्शनवर, सिनियर प्रोजेक्ट मॅनेजर वर गुन्हा दाखल; तामसा येथील घटना

तामसा ।प्रतिनिधी

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोल नाक्यावर रुद्राणी कन्स्ट्रक्शनच्या हलगर्जीपणामुळे पर्यायी रस्ता न काढता रस्त्यावर टाकण्यात आलेले 'क्रेश बॅरियर'ला टक्करून मोटरसायकलचा अपघात झाला. त्यात मोटारसायकल चालकाचा जागीच मृत्यू झाला असून रुद्राणी कन्स्ट्रक्शन व प्रोजेक्ट मॅनेजरवर मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्याची घटना दि. २१ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी मध्यरात्री एक वाजतानंतर घडली.

अर्धापूर ते तामसा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ (आय) महामार्गावर तामसा नजीक टोलनाका उभारण्याचे काम एक वर्षापासून कासवगतीने सुरु आहे. टोलनाका उभारण्याचे काम सुरु असताना रुद्राणी कन्स्ट्रक्शनकडून कोणत्याही प्रकारचा पर्यायी रस्ता, दिशादर्शक चिन्ह, काम चालू असल्याचे दिशादर्शक बोर्ड, बॅरिकेट्स, बॅनर, रेडियम लावून वाहनचालकांना धोक्याचा इशारा देणाऱ्या कसल्याच निशाण्या, पाट्या लावलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्यावरील वाहतुकीत येणारे अडथळे दिसत नसल्याने अपघात घडले आहेत. दि २१ नोव्हेंबर रोजी रात्री अंदाजे एक वाजताचे सुमारास घडली आहे. तामसा येथील 'आंध्रा' इडली सेंटरचे मालक सतीश सुरेश बारसे (वय ३६) राहणार बारसगाव ता. अर्धापूर हे मोटारसायकल क्रमांक एम. एच. - २० एफ. बी. ८४७७ वरून गुरुवारी रात्री नांदेडहून हॉटेलचे साहित्य खरेदी करून तामस्याकडे येत होते. राष्ट्रीय महामार्गावर तामसा नजीक नियोजित टोलनाक्याचे काम सुरू असल्याने रस्त्यावरच ठेवण्यात आलेले सिमेंटचे प्लेट 'क्रॅश बॅरियर' ठेवलेले त्यांना दिसले नसल्याने त्यावर मोटारसायकल धडकल्याने मोठा अपघात झाला. त्यातच चालक सतीश बारसे यांचा जागीच मृत्यू झाला. मयताचा भाऊ माणिक सुरेश बारसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी छत्रपती संभाजीनगर व कंपनीचे सिनिअर प्रोजेक्ट मॅनेजर धोंडीराम जांभळे यांचे विरुध्द मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार बालाजी नरवटे करीत आहेत.पण आधाप ही आरोपी ला अटक झाली नाही किंव्हा अटक केली नाही.. झालेली घटना अतिशय गंभीर असून तामसा पोलिसांनी सूत्र हळीवले नाही का ? संबंधित राष्ट्रीय महामार्ग प्रधिकारण विभाग कंट्रक्शन कंपनी विरुद्ध काय कारवाई करणार यांचा कडे सर्वांचे लक्ष लागलं आहे.

# जलतारा प्रकल्पाचा बरबडा येथे काम प्रगतीपथावर चालू

जलसुरक्षेसाठी शेतकऱ्यांचा पुढाकार घेण्यात यावे

नायगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील बरबडा येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पंचायत समिती नायगाव येथे राबविण्यात येणाऱ्या जलतारा या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा शुभारंभ लालवंडी (ता. नायगाव) येथे कृषी उपसंचालक यांच्या उपस्थितीत करण्यात आला. शेती व शेतकऱ्यांच्या जलसुरक्षेसाठी शेतात ५ह्र५ फुटांचे खड्डे तयार करून त्याचे पुनर्भरण करण्याद्वारे भूजल पातळी वाढविणे हा या योजनेचा उद्देश आहे. या अंतर्गत प्रत्येक खड्ड्यासाठी ५ हजार रुपये अनुदान मिळणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.मोहन मैसनवाड यांनी बरबडा येथील शेतकऱ्यांना देण्यात आली तेचे काम प्रगतीपथावर चालू आहे येथील शेतकऱ्यांनी २६ जानेवारीपर्यंत १ हजार खड्ड्यांची पूर्तता करण्याची हमी देत या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांनी या योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहनही अधिकाऱ्यांनी केले. कार्यक्रमास कृषी उपसंचालक वानखेडे, गटविकास अधिकारी ढवळे, तालुका कृषी अधिकारी देवरे, सहाय्यक कृषी अधिकारी मोहन म्हैसनवाड, यांनी बरबडा येथील शेतकऱ्यांना या कार्य सहभाग घेण्यात यावे असे आवाहनही केले आहे

# भाजप जिल्हा निवडणूक संचालन समितीवर प्रा. मनोहर पवार यांची निवड – सामाजिक संपर्क विभागाची धुरा सोपवली

नायगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाने जिल्हा पातळीवर सूक्ष्म आणि भक्कम नियोजनाला सुरुवात केली असून यासाठी २० विभागांची जिल्हा निवडणूक संचालन समिती गठीत करण्यात आली आहे. त्यातील महत्त्वपूर्ण सामाजिक संपर्क समितीच्या प्रमुख पदाची धुरा भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा पंचायत



समिती नायगावचे माजी सभापती प्रा. प्राचार्य मनोहर पवार यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

सदर समिती अंतर्गत सर्व जाती–समाजांना एकत्रित बांधून पक्षाची विचारसरणी तळागाळात पोहोचवणे आणि भाजपाचा जनाधार वाढविण्याची जबाबदारी प्रा. पवार यांच्यावर सोपविण्यात आली आहे. मागासवर्गीय घटकांमध्ये असलेला दमदार संपर्क, संघटन कौशल्य, जिद्द व झोकून देऊन काम करण्याची कार्यशैली याचा योग्य परामर्श करून ही अत्यंत महत्त्वाची नियुक्ती पक्षाने त्यांच्यावर विश्वासाने दिली आहे.प्रा. पवार यांच्या निवडीचे वृत्त समजताच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला आहे.या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना प्रा. मनोहर पवार म्हणाले–पक्षाने माझ्यावर दाखविलेला विश्वास मी सार्थ ठरवेल. दिलेल्या जबाबदारीचे रूपांतर विजयात करून दाखवणे हाच माझा हेतू असेल.